अहवाल क्रमांक : १७७

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

बीड जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील

## एकतीसावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक १ जुलै, २०१९ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१९

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**बीड जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील**

## एकतीसावा अहवाल

## पंचायती राज समिती

**(सन २०१७-२०१८)**

**समिती प्रमुख**

(१) श्री.सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.

(६) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(८) *** रिक्त

(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.

(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(२२) *** रिक्त

(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२९) * श्री.किशोर दराडे, वि.प.स.

(३०) ** श्री.निलय नाईक, वि.प.स.

(३१) ** श्री.निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(५) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

* श्री.किशोर दराडे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर, २०१८ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

** श्री.निलय नाईक, वि.प.स. व श्री. निरंजन डावखरे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च, २०१९ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

*** डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. व प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

# (पंचायती राज समिति
## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख**

१. * श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१४. ॲड .के. सी. पाडवी, वि.स.स.
१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री. अमित झनक, वि.स.स.
१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. **रिक्त
२५. ** रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची " कार्यकारी समिती प्रमुख " म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

पंचायती राज समिती
(सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री. आर. टी .देशमुख, वि.स.स.
७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१५. ॲड. के. सी.पाडवी, वि.स.स.
१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री. अमित झनक, वि.स.स.
१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. पांडुरंग फुंडकर; वि.प.स.
२२. श्री.अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
(४) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**प्रस्तावना**

मी, पंचायती राज समितीचा '' समिती प्रमुख '' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा एकतीसावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Time of administration) मा. सभापती, विधानपरिषद व मा. अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislative) या समितीला '' Mini Legislature '' सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party ) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधिमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे.

थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१२-१३ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन व सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-१८ साठी गठीत झालेल्या समितीने बीड जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने बीड जिल्हा परिषदेस दिनांक १०, ११ व १२ जानेवारी, २०१८ रोजी भेट देऊन श्री.धनराज निला, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १, ८, ९ व १६ जानेवारी, २०१९ रोजी जिल्हा परिषद, बीड संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री.श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, डॉ.प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्रीमती आभा शुक्ला, प्रधान सचिव, सहकार विभाग, श्री.असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री.एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री.रा.वा.पानसे, सचिव (प्र.स.), जलसंपदा विभाग, श्री.चं.प्र.जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.भा.र.गावित, सह सचिव, विमुक्त जाती भटक्या जमाती व इतर मागासवर्ग कल्याण विभाग, श्री.ला.रा.गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री.र.प्र.आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.र.आ. नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.गिरिष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.म.रं.शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री.संतोष कराड, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.गो.भ.शिंदे, अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. विजय कुमार कलवले, सहाय्यक संचालक, मृद व जलसंधारण विभाग, श्री.दि.रा.टकले, कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, श्री.परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, श्री. सतिश सोनी, आयुक्त, सहकार विभाग, श्री.एस.एल. अहिरे, संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती, श्री.विजय कुंदेवाड, सह संचालक, आरोगय सेवा संचालनालय, डॉ.एस.एन.जाधव, उपनिबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त कार्यालय तसेच श्री.प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात

केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या बीड जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २७ जून, २०१९ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

विधान भवन,<br>मुंबई,<br>दिनांक : २७ जून, २०१९.

**सुधीर पारवे**<br>समिती प्रमुख,<br>पंचायती राज समिती

**अनुक्रमणिका**


| अ.क्र. (१) | प्रकरण (२) | विषय (३) | पृष्ठ क्रमांक (४) |
|---|---|---|---|
| (१) | एक | जिल्हयातील विधानमंडळ सदस्य व जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांसमवेत केलेल्या अनौपचारिक चर्चेसंदर्भात | १ |
| (२) | दोन | प्राथमिक आरोग्य केंद्र, नायगाव, ता.पाटोदा, जि.बीड | १० |
| (३) | तीन | बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये पाटोदा पंचायत समितीचे सन २०१३-१४ पासून रुपये ७ कोटी ५८ लाख बँकेच्या खात्यामध्ये अडकून पडले असल्याबाबत | १३ |
| (४) | चार | प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, पारनेर ता.पाटोदा, जि.बीड | १७ |
| (५) | पाच | बीड जिल्ह्यातील चार पंचायत समित्यांना स्टाफ पॅटर्न मंजुर नसल्यामुळे शिक्षण विभागातील पदे मंजुर नाहीत त्यामुळे प्रभारी अधिकाऱ्यांना काम करणे जिकरीचे झाल्याबाबत | १९ |
| | | **परिशिष्ट (अ)** **शासनाचे आदेश, शासन निर्णय व परिपत्रके** | २१ |
| | | **परिशिष्ट (ब)** **समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | २७ |

## प्रकरण एक

### जिल्हा परिषद, बीड (प्रशासन)

### जिल्हयातील विधिमंडळ सदस्य व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत केलेल्या अनौपचारिक चर्चेसंदर्भात

पंचायती राज समितीने दिनांक १०, ११ व १२ जानेवारी, २०१८ या कालावधीत बीड जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे बीड जिल्हयातील विधिमंडळ सदस्य व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्या सोबत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबींसंदर्भात बीड जिल्हा परिषदेतील वित्त विभाग, जलसंधारण विभाग, बांधकाम विभाग, लघू पाटबंधारे विभाग या चारही विभागांचे विशेष लेखा परिक्षण झाले असून वित्त विभाग यावर सभापती, समाजकल्याण समिती जिल्हा परिषद बीड यांनी समितीला विशद केले की, या चार विभागातील भ्रष्टाचारात त्यावेळेचे अधिकारी आणि पदाधिकारी यांनी संगनमत केले असेल. त्याशिवाय असे होऊ शकत नाही. या भ्रष्टाचारामुळे शासनाचे जवळपास ८० ते ९० कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. सदरहू पैसा कंत्राटदाराच्या खात्यातून (अकाऊंटवरुन) किंवा ज्या कोणाच्या खात्यावर (अकाऊंटवर) असेल त्या खात्यावरुन कोठे गेला, याची चौकशी झाली पाहिजे. यासंदर्भात वसुली (रिकव्हरी) करण्यात यावी, उपलब्ध असलेल्या कागदपत्रांमध्ये स्पष्ट लिहिलेले आहे. परंतु संबंधितांकडून वसुली झालेली नाही. तसेच कोणावरही दायित्व दाखल करण्यात आलेले नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला पुढीलप्रमाणे उत्तर दिले की, काही अधिकाऱ्यांवर दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले आहेत. यावर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेश दिले की, यांनी संबंधितांवर केवळ दोषारोप पत्र दाखल केले. त्यानंतर कोणतीही कार्यवाही केलेली नाही. याबाबत समितीद्वारे कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

तद्नंतर सभापती, शिक्षण समिती यांनी समितील विशद केले की,जिल्हा परिषदेला पूर्वी असलेले अधिकार देण्यात यावे, अशी आमची अपेक्षा आहे. तसेच जिल्हा परिषदेला बदल्यांचे अधिकार देण्यात यावे. जिल्हा परिषदेमध्ये शिक्षण विभागाचे काम मोठ्या प्रमाणात आहे. तसेच सन २०१२ पासून सादीक निधी भाडे देण्यात आलेला नाही. भाड्याची थकीत असलेली १ कोटी रुपयांची रक्कम अजूनपर्यंत आलेली नाही. जवळपास १५० शाळांच्या इमारती भाड्याने घेण्यात आलेल्या आहेत. तसेच सर्व शिक्षा अभियानामधूनही निधी येणे बंद झालेले आहे. येथे शिक्षण विभागाच्या इमारती कमी आहेत. इमारतींचे भाडे थकल्यामुळे इमारत मालकांनी इमारती खाली करण्याकरिता तगादा लावलेला आहे. तसेच फॅब्रिकेटेड अंगणवाड्या झालेल्या आहेत. थोड्या जोराने हात मारला की, फॅब्रिकेटेड अंगणवाडीच्या भिंती पडतात. त्यामुळे फॅब्रिकेटेड अंगणवाड्यांचे बांधकाम सिमेंट कॉंक्रिटचे करण्याची आवश्यकता आहे. तसेच महिला बाल कल्याण विभागाला स्वतंत्र लेखाशिर्ष (हेड) देण्यात यावे. यावर समितीने संबंधित अधिकाऱ्यांना विचारणा केली की, यासंदर्भात विभागाचे काय म्हणणे आहे. यावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, फॅब्रिकेटेड टेक्नॉलॉजीमध्ये रेडीमेड स्ट्रक्चर आहे. फिटींग करुन ते उभे करता येते. मागील आर्थिक वर्षामध्ये असलेल्या निर्णयामध्ये आता बदल झालेला आहे. दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी झालेल्या शासन निर्णयानुसार यासंदर्भातील दुरुस्तीसाठी लेखाशीर्ष निर्माण केलेले आहे. यावर समितीने विचारले की, अंगणवाड्या ह्या फॅब्रिकेटेडच बांधाव्यात असा शासनाचा आदेश आहे काय, असेल तर आदेशाची प्रत दाखविण्यात यावी. यावर तसा शासन निर्णय नाही. परंतु बीड जिल्ह्यापुरता तसा निर्णय होता. असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला उत्तर दिले. यावर समितीने विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगावे की, असा स्पेशल निर्णय बीड जिल्ह्यापुरता होऊ शकतो काय, हा विषय अत्यंत गंभीर आहे. जिल्ह्यामध्ये १५० अंगणवाडी भाड्याच्या जागेमध्ये भरविण्यात येतात. फॅब्रिकेटेड कुचकामी व कमकुवत असल्याने व त्यासंदर्भातील निधी व्यपगत झाला आहे. सभापती यांच्या निवेदनातील स्पेशल ऑडीट व फॅब्रिकेटेड अंगणवाडीच्या मुद्यांच्या अनुषंगाने विभागाच्या सचिवांची साक्ष लावण्यात यावी. यावर जिल्हापरिषद सदस्य यांनी समितीला पुढीलप्रमाणे माहिती दिली की, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घन कचरा व्यवस्थापन व तळी सुवर्ण महोत्सवी व्यवस्थापन या योजनेवरील निधी सन २०१२-१३ मध्ये देण्यात आलेल्या निधीतून अनेक ग्रामपंचायतींनी निविदा प्रक्रिया न राबवता कामे केली आहेत, तसेच काही कामे न करता त्याचे पैसे उचलले आहेत. सुमारे ९८ ग्रामपंचायतींपैकी १७ ग्रामपंचायतींनी उक्त योजनेचे काम केलेले नाही. सदरहू प्रकरणी संबंधितांकडून थकित रक्कम वसूली करण्यात यावी व गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी तक्रार देखील करण्यात आली होती. सदरहू प्रकरणी अद्याप कार्यवाही झालेली नाही.

तद्नंतर सभापती, शिक्षण व आरोग्य समिती यांनी समितीस विनंती केली की, ग्रामपंचायत पाणी पुरवठ्याच्या अनेक योजना अपूर्ण स्थितीत आहेत. उक्त योजना सीएमजीएसवायमध्ये रूपांतरित करण्याबाबत विनंती केली. तसेच, जिल्ह्यातील ४०० पेक्षा अधिक पाणी पुरवठा योजनेची कामे बंद आहेत. यापूर्वी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे निधी नव्हता परंतु आता उपलब्ध झाला असून त्यांनी तो वितरीत करण्याबाबतही समितीने शिफारस करावी. तद्नंतर समितीने विचारणा केली की, सदरहू प्रकरणी सुमारे ५७ ग्रामपंचायतींनी भ्रष्टाचार केला असून उक्त प्रकरणी थकित रक्कम वसूल करण्याबाबत नोटिसा देण्यात आल्या आहेत याबाबतची सविस्तर माहिती समितीला सादर करावी. यावर जिल्हा परिषद सदस्य, बीड यांनी समितीला विदित केले की, सांडपाणी व्यवस्थापन व नळ योजनेमध्ये भ्रष्टाचार झाला असून गोलंग्री येथे राबविण्यात आलेल्या योजनेच्या कामामध्ये

व एमआरईजीएसच्या कामांमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. समितीने तेथे भेट द्यावी, अशी विनंती आहे. यावर समितीने पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले की, अनौपचारिक चर्चेच्या वेळी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा, शिक्षण, आरोग्य, रस्ते अशा बऱ्याच मुद्यांच्या संदर्भात माहिती दिली आहे. विशेष लेखापरीक्षण संदर्भात भ्रष्टाचार व अनियमितता यासंदर्भात आरोप करण्यात आले आहेत. महिला व बाल कल्याण विभागाच्या संदर्भात फॅब्रीकेटेड अंगणवाडी या मुद्याबाबतची ही चर्चा झाली आहे. उक्त चर्चेत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांच्या संदर्भात समितीला निवेदन सादर करण्यात यावे. समितीने लोकप्रतिनिधींच्या सर्व मुद्यांची नोंद घेतली आहे. असे जिल्हा परिषद पदाधिकारी यांना समितीने आश्वासन दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली**

(१) बीड जिल्हा परिषदेमध्ये वित्त विभाग, जलसंधारण विभाग, बांधकाम विभाग, लघुपाटबंधारे विभाग या चार विभागातील तत्कालीन अधिकारी व पदाधिकारी यांनी संगनमताने गैरव्यवहार केल्यामुळे शासनाचे जवळपास रूपये ८० ते ९० कोटी नुकसान झाल्याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधीताविरूध्द जबाबदारी निश्चित करून पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

(२) बीड जिल्हयामध्ये फॅब्रीकेटेड अंगणवाडया बांधण्याबाबत दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी झालेल्या शासन निर्णयानुसार कोणत्या लेखाशिर्षाखाली बीड जिल्हयापुरता निर्णय घेण्यात आला आहे. तसेच बीड जिल्हयामध्ये १५० अंगणवाडया भाडयाने घेतलेल्या जागेमध्ये भरविण्यात येतात, फॅब्रीकेटेड अंगणवाडया कुचकामी व कमकुवत असल्याने त्यासाठीचा निधी व्यपगत झाला आहे, या प्रकरणी महिला व बाल विकास विभागाची भुमिका काय आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**(अ) बांधकाम विभागाच्या विशेष लेखा परिक्षा अहवालात खालील प्रमाणे अनियमितता झालेली असलेबाबत नमुद केले आहे.**

(१) प्राप्त तरतुदी पेक्षा जास्त खर्च करणे.

(२) प्राप्त तरतुदी पेक्षा जादा प्रशासकीय मान्यता देऊन अतिरिक्त दायीत्व निर्माण करणे.

(३) एकाच गावात प्रमाणा बाहेर शासन व जिल्हा परिषदेचा निधी खर्च करणे.

(४) विखंडीत कामावर देयके प्रदान करणे.

(५) मुदतबाहय देयकाचे नियमाबाहय देयके अदा करणे.

(६) विहीत पतमर्यादेपेक्षा जास्तीचे काम म.स.स./सु.बे.अ. यांना नियमबाहयपणे वाटप करणे.

(७) देयक नोंदवहीत न नोंदविता व न तपासता देयक अदा करणे.

(८) उप अभियंता कडून चेकींग न घेणे.

(९) कार्यकारी अभियंता त्यांची मोजमाप तपासणी नसणे.

असणाऱ्या बांधकाम व वित्त विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांचे नावे खालील प्रमाणे आहे.

(१) श्री.एस.आर.शेंडे, तत्कालिन कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्र.१ जिल्हा परिषद बीड (सेवानिवृत)

(२) श्री.पी.एम.चंदशिव, तत्कालिन प्रभारी कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग क्र.२ जिल्हा परिषद बीड (सेवानिवृत्त)

(३) श्री.वसंत तुळशिराम जाधवर, तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद बीड

(४)श्री.के.बी.सरक, तत्कालीन उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग अंबाजोगाई (सेवानिवृत्त)

(५) श्री.बी.बी.लांडगे, श्री. बी.एल. पवळ व श्री.एस.एस.पटेल सर्व तत्कालीन शाखा अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग अंबाजोगाई.

उपरोक्त दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(१) तत्कालीन श्री.एस.आर.शेंडे, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र.१ बीड यांना शासन स्तरावरून सार्वजनिक बांधकाम विभाग शासन आदेश क्र.एस-९२/१४१५/प्र.क्र.३४/ सेवा-६(ब) दि. २७/०८/२०१५ अन्वये निलंबीत करण्यात आले आहे व त्याच चौकशी प्रकरणी सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद बीड यांचे पत्र क्र.बाविक-१/आस्था-३/कवि-१५४/१६.

दि. १७/०५/२०१६ अन्वये दोषारोप पत्र तयार करून शासनास सादर करण्यात आलेले आहे व त्याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभाग ज्ञापन क्र.एस-९२/१४१५/प्र.क्र.३४/सेवा-६(ब) दि.३०/१२/२०१६ अन्वये श्री.एस.आर.शेंडे यांना ताकीद देवून प्रकरण निकाली काढण्यात आले आहे.

(२) श्री.पी.एम.चंदनशिव, तत्कालिन प्रभारी कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्र.२ जिल्हा परिषद बीड (सेवानिवृत्त) यांचे विरूध्द बीड शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१४१ दि.३०/०७/२०१५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.एस-९२/१४१८/प्र.क्र.०६/सेवा-६(ब) दि.२१/०३/२०१८ अन्वये विभागीय चौकशी सुरू करण्यात आलेली आहे.

(३) श्री.के.बी.सरक, तत्कालिन उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उप विभाग अंबाजोगाई (सेवानिवृत्त) यांचे विरूध्द बीड शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१४१ दि.३०/०७/२०१५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.एस-९२/१४१५/प्र.क्र.१३३/सेवा-६(ब) दि.१०/०६/२०१६ अन्वये निलंबीत करण्यात आलेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.एस-९२/१४१८/प्र.क्र.०६/सेवा-६ (ब) दि.२१/०३/२०१८अन्वये विभागीय चौकशी सुरू करण्यात आलेली आहे.

(४) श्री. वसंत तुळशिराम जाधवर,तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांचे विरूध्द बीड शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १४१ दि.३०/०७/२०१५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

(५) श्री.बी.बी.लांडगे, श्री.बी.एल.पवळ व श्री.एस.एस.पटेल सर्व शाखा अभियंता यांना दि.०१-०७/२०१५ च्या आदेशान्वये जिल्हा परिषद, बीड सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्ये विरूध्द बीड शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१४१ दि.३०/०७/२०१५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. तीनही शाखा अभियंताची विभागीय चौकशी करण्यात आलेली आहे. तसेच विभागीय चौकशीचे आदेश प्राप्त झालेले आहेत परंतू प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्यामुळे शास्ती देण्यात आलेली नाही.

(अ) प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य ईमारत चिंचोलीमाळी दुरूस्ती करणे सदरील कामाबाबत गंभीर अनियमितता आढळून आलेली असल्यामुळे तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.वंसत तुळशिराम जाधवर व चेअरमन संत ज्ञानेश्वर मजूर संस्था मर्या. कासारी ता.धारूर यांच्यावर दि.०३/०३/२०१५ रोजी क्र.४०/२०१५ (भ.द.वि) अन्वये शहर पोलीस स्टेशन बीड येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

(ब) पंचायती राज समिती दिनांक १० ते १२ जानेवारी, २०१८ या कालावधीत बीड जिल्हा परिषदेला भेट दिली असता बीड जिल्हयातील विधानमंडळ सदस्य व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्या सोबत केला अनौपचारीक चर्चेच्यावेळी विशेष लेखा परिक्षणाबाबत चर्चा झाली या विषयी सादर करण्यात येते की, बीड जिल्ह परिषदेचे विशेष लेखा परिक्षण दि.०३.१०.२०१३ ते ३०.११.२०१४ या कालावधीचे झालेले आहे. त्यामध्ये वित्त विभागाचे लेखा परिक्षणात मुख्यतः खालील अनियमितता झाली असल्याचे नमुद केले आहे.

(१) जिल्हा निधीची रक्कम १००,०००,०००/-(दहा कोटी) जिल्हा परिषद उपकरात नियमबाहयपणे वर्ग करण्यात आलेली आहे.

(२) जिल्हा परिषद स्वनिधीच्या रू.२०,०४,५०,७३०/- दायित्व निर्माण केले आहे.

(३) तेराव्या वित्त आयोगातून संगणक इ. साहित्याची नियमबाहय खरेदी करण्यात आलेली आहे व इतर अनियमितता झालेली आहे.

त्या अनुषंगाने खालील कर्मचारी दोषी आढळून आलेले आहेत.

(१)श्री. व्ही.टी.जाधवर (तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद बीड)

(२) श्री.एल.टी.चौरे (तत्कालीन कनिष्ठ लेखाधिकारी वित्त विभाग)

(३) श्री.आर.बी.सरवदे (वरिष्ठ सहा. (लेखा) वित्त विभाग.

उपरोक्त दोषी कर्मचाऱ्यांवर खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

(१) श्री. व्ही.टी. जाधवर, तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना शासनाच्य वित्त विभागाच्या आदेश क्र. वि.भ.चौ.१०१४/प्र.क्र३६ कोषा-१ मादाम कामा रोड हुतात्मा चौक राजगुरू चौक मंत्रालय मुंबई ४०००३२, दिनांक २२ जुलै, २०१५ अन्वये त्यांना निलंबीत करून त्यांच्या विरूध्द शासन स्तरावरून विभागीय चौकशी दि. ३१.७.२०१७ च्या आदेशान्वये सुरू करण्यात आली असून शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांच्याकडे चालू आहे.

तसेच त्यांच्या विरूध्द बीड शहर पोलीस स्टेशन येथे दिनांक ०३.०३.२०१५ रोजी गु.र.नं. ४०/२०१५ भा.द. वि.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे गु.र.नं. १४१ दिनांक ३०.०७.२०१५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

(२) श्री.चौरे एल.टी. कनिष्ठ लेखाधिकारी (सेवानिवृत्त) यांना सेवेतून निलंबीत करण्यात आले होते. ते निलंबित असतानाच नियत वयोमानानुसार सेवेतून सेवानिवृत्त झाले. त्यांच्या विभागीय चौकशीचा अहवाल, सहाय्यक आयुक्त (चौकशी) विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त झाला असून चौकशी अहवालात त्यांना अंशतः दोषी धरले आहे. त्या अहवालाच्या अनुषंगाने त्यांच्यावर शास्ती लावण्याचा प्रस्ताव व अंतिम कारणे नोटीस दिनांक २०.१२.२०१८ रोजी देण्यात आली आहे. या बाबतची कार्यवाही अंतिम टप्पात आहे.

(३) श्री. सरवदे आर.बी. वरिष्ठ सहा. (लेखा) यांना सेवेतून निलंबीत करण्यात येवून त्यांची विभागीय चौकशी होवून सहाय्यक आयुक्त (चौकशी) विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांचा चौकशी अहवाल प्राप्त झाला असून त्यामध्ये अंशतः दोषी धरले आहे. त्या अहवालाचा अनुषंगाने त्यांच्यावर शास्ती लावण्याचा प्रस्ताव व अंतिम कारणे नोटीस दिनांक २०.१२.२०१८ रोजी देण्यात आली आहे. या बाबतची कार्यवाही अंतिम टप्पात आहे.

(क) अनुपालन सादर करण्यात येत आहे की, लघुपाटबंधारे विभागाचे स्थानिक निधी विशेष लेखा परिक्षण ३.१०.२०१३ ते ३०.११.२०१४ या कालावधीचे झालेले असून अहवालानुसार शासनाने तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जवळीकर यांच्या विरोधात प्रशासकीय कार्यवाही करून तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.जाधव यांना दिनांक २२.०२.२०१५ रोजी निलंबीत केलेले आहे.

(१) पत्र क्र.लपावि/आस्था-१/१६७७ दिनांक २०.०८.२०१६ अन्वये तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. बी.एच गर्जे व श्री. एस.आर. कुलकर्णी यांच्याविरोधात गैर व्यवहाराच्या कारणावरून खाते निहाय चौकशी करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी मा.प्रधान सचिव जलसंपदा विभाग, मंत्रालय मुंबई -३२ यांना जोडपत्रे १ ते ४ प्रस्ताव आवश्यक त्या अभिलेखेसह सादर केलेला आहे.

(२) मा.आयुक्त ए.बा.वि.से.यो.महाराष्ट्र राज्य नवी मुंबई यांचे पत्र क्र. जा.क्र./एबाविसेयो/अंबा/का-७/८५८/२०१६ दिनांक ११.०३.२०१६ रोजीच्या पत्रान्वये बीड जिल्हया करीता द्रद्धड्ढ-ढ्ढड्डद्धत्ड्ड्ढ्यड्ढड्ड अंगणवाडी इमारत बांधकाम करण्यासाठी रू.१८,५६,२५,०००/-(अठरा कोटी छप्पन लक्ष पंचवीस हजार रू.) निधी प्राप्त‍ झाला होता. सदरील निणूय हा फक्त बीड जिल्हयाच्या मर्यादेत नसून इतर बारा जिल्हयासाठी देखील निर्णय होता. तसेच द्रद्धड्ढ-ढ्ढड्डद्धत्ड्ड्ढ्यड्ढड्ड अंगणवाडी याबाबत आयुक्त ए.बा.वि.से.यो.नवी मुंबई यांना दिनांक १६.०५.२०१६ रोजी पत्रान्वये मार्गदर्शन मागविण्यात आले तसेच दिनांक ०८.११.२०१६ रोजी पत्रकान्वये मार्गदर्शन मागविण्यात आले तसेच दिनांक ०१.०८.२०१६ रोजी पत्रकान्वये द्रद्धड्ढ-ढ्ढड्डद्धत्ड्ड्ढ्यड्ढड्ड ऐवजी वीट बांधकामास परवानगीची मागणी करण्यात आली होती.

मा.सचिव महिला व बालविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.एबावि-२०१६/प्र.क्र.३०१/का.६ महिला व बाल विकास विभाग मुंबई दि.८ फेब्रवारी, २०१८या द्वारे द्रद्धड्ढ-ढ्ढड्डद्धत्ड्ड्ढ्यड्ढड्ड अंगणवाडी बांधकाकामाचा नमुना आराखडा च्द्धड्ढ द्रथ्ड्ढद शासन स्तरावर अद्याप अंतिम झालेला नसल्यामुळे विविध योजनेतून प्राप्त होणाऱ्या निधीमधून अंगणवाडीची बांधकामे आर.सी.सी. पध्दतीने करण्याबाबत कळविले आहे.

अवर सचिव, महिला व बालविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.एबावि-२०१७/प्र.क्र.३२५/का.६ दि.३ जानेवारी, २०१८ यांच्या पत्रकान्वये निधी कोषागारात भरणे बाबतचे पत्र असल्याने सदरील निधी २० जानेवारी, २०१८ मध्ये कोषागारामध्ये चलनद्वारे भरणा केला आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**(अ) सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिप्राय :-** श्री.चंदनशीव हे दिनांक ३१.१२.२०१२ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यामुळे म.ना.से.(निवृत्ती वेतन) नियम १९८२ च्या नियम २७ नुसार विभागीय चौकशी करता येत नाही.

श्री. के. बी. सरक यांचेसंदर्भात शासन आदेश सा.बा.वि.क्रमांक एस ९२/१४१/प्र.क्र.०६/सेवा ६ब दिनांक ४.८.२०१८ अन्वये प्रा.वि.चौ.अ.औरंगाबाद यांची नियुक्ती करण्यात आली असून हे प्रकरण प्रगतीत आहे.

**(ब) वित्त विभागाचे अभिप्रायः-** श्री. वसंत तुळशिदास जाधवर, तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद बीड यांची म.ना.से.(शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ खाली विभागीय चौकशी सुरू करण्यात आली असून, दिनांक २६.७.२०१७ च्या आदेशान्वये प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शासनास अद्याप चौकशीचा अहवाल प्राप्त झालेला नाही.

**(क) मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्रायः-जिल्हा** परिषद बीड यांनी दिलेल्या माहितीशी सहमत आहे.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (आस्था-२) बीड जिल्हा परिषदेतील तत्कालीन प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड श्री. जवळेकर यांचेविरूध्द दि.२७.९.२०१७ च्या ज्ञापनान्वये दोषारोपपत्र बजावून विभागीय चौकशी आदेशित करण्यात आली. या प्रकरणी दिनांक

७.१२.२०१७ अन्वये सचिव व विशेष चौकशी अधिकारी - २ सा.प्र.वि.मंत्रालय,मुंबई यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. सदर प्रकरणी सुनावणी दि. १९.१२.२०१८ रोजी पार पडली असून अंतिम चौकशी अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. अन्य एका प्रकरणी (शिक्षण बदल्या,समायोजन, संगणक खरेदी इ.) श्री. जवळेकर तत्कालीन प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,बीड यांचे विरूध्द विभागीय चौकशीची कार्यवाही पूर्ण करून दि. १७.९.२०१८ च्या आदेशान्वये श्री.जवळेकर यांच्याकडून शासन नुकसानीच्या रकमेपैकी २५टक्के रक्कम म्हणजे रू.२,०४,७८८/- त्यांच्या वेतनातून पाचा समान हप्त्याऐवजी सेवानिवृत्ती दिनांकापूर्वी (दि.३०.११.२०१८) वसूल करण्यात यावी. तसेच शिक्षा म्हणून त्यांचे वेतन एक टप्प्याने कायमस्वरूपी खाली आणण्यात यावे. सदर कालावधीतील वेतनवाढ त्यांना देय राहिल अशी शिक्षा बजावण्यात आली आहे.

**महिला व बाल विकास विभागाचे अभिप्राय :-** बीड जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सोलापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १, ८ व ९ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विभागीय सचिवांना विचारणा केली की, समितीने बीड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळेस काही अनौपचारिक चर्चा झाली होती. बीड जिल्हा परिषदेमध्ये वित्त विभाग, जलसंधारण विभाग, बांधकाम विभाग, लघू पाटबंधारे विभाग या ४ विभागांतील तत्कालीन अधिकाऱ्यांच्या गैरव्यवहारांच्या संदर्भात चौकशी करण्याबाबत आपण समितीला आश्वासित केले होते. या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे व काही अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई केलेली आहे. संबंधितां विरुध्द जी कारवाई केलेली आहे, ती पुरेशी आहे काय, तसेच यामध्ये अधिकारी आणि पदाधिकारी यांच्या संगनमताने गैरव्यवहार केला आहे, असा आरोप केला आहे. मात्र पदाधिकाऱ्यांचा काय दोष आहे याबाबतची माहिती अनुपालन अहवालात कुठेही दिसत नाही, यावर मृद व जलसंधारण विभागाच्या सचिवांनी खुलासा केली की, यामध्ये सामान्य तक्रारीचा विषय आहे. जलसंधारणच्या कागदपत्रामध्ये (डॉक्युमेंट) जो विषय आहे त्यानुसार श्री.गर्जे व श्री.कुलकर्णी नावाचे दोन कार्यकारी अभियंता होते. यामध्ये मूळ आक्षेप असा आहे की, मूळ तरतूद २ लाख होती. वाढीव तरतूद ५५ लाख झाली. त्याच्या (अगेन्स्ट) यांनी कामाला ३ कोटी ३१ लाखांची प्रशासकीय मान्यता दिली. हा त्यांचा स्व उत्पन्नातील सेसमधील पैसा होता. त्यांनी ५५ लाखांच्या कामाला ३ कोटी ३१ लाखांची अतिरिक्त मान्यता दिली. या प्रकरणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी व सर्व लोकांची एका विशेष लेखा परीक्षकांमार्फत चौकशी करण्यात आली. त्यांच्यावर दोषारोपपत्र दाखल केले आहे. सन्माननीय सदस्यांनी संगनमताच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने सेसच्या निधीचा मुद्दा असल्याने ते असण्याची शक्यता आहे. दुसरे काही अहवालामध्ये दिसत नाही. समितीने दिलेल्या प्रश्नावलीमध्ये त्याचा उल्लेख आहे मात्र अहवालात त्याचा कोठे उल्लेख नाही. यावर समितीने सचिवांना विचारणा केली की, यामध्ये पदाधिकाऱ्यांनी आपल्या अधिकारांचा दुरुपयोग केला असा काही आरोप आहे काय ? त्यांना जे प्रशासकीय मान्यतेचे अधिकार होते, त्या अधिकारांचा दुरुपयोग केला, आहे काय, यावर सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी समितीस विशद केले की, मूळ मुद्दा हाच होता की, मूळ तरतूद २ लाख होती. त्याच्या विरूध्द ५५ लाख, मग नंतर ३ कोटी २७ लाखांची कामे केली. व त्यांनी स्व निधीतून असा उल्लेख केला आहे. यावर सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी समितीस विशद केले की, डी.पी.सी. चा आहे व त्यांचा सेसचा झेड.पी.आर.मध्ये तरतूद दाखविलेली आहे तो पैसाही आहे. परंतु, हा कमी आहे. सन २०१३-२०१४ मध्ये समितीचा जो अहवाल दाखल झाला होता त्याची प्रत आहे. त्यावरुन ते दिसत आहे. यावर समितीने सचिवांना विचारणा केली की, यामध्ये एवढे मोठे आरोप (ॲलिगेशन) करण्यात आले आहे. शासनाचे ८० ते ९० कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. असे आरोप असतानाही याबाबतच्या चौकशीचा अहवाल थोडक्यात दिलेला आहे तो बिलकुल समाधानकारक नाही. २७०२ या हेडमध्ये मर्यादेपेक्षा जास्त काम घेऊ शकत नाही. कामे वाढवली कशी ? अगोदर २ लाखांचे काम होते, मग रूपये ५५ लाखांचे झाले, मग रुपये ३ कोटी ३१ लाख रुपये प्रशासकीय मान्यता नसताना रुपये ३ कोटीचे काम केले हे चुकीचेच आहे ना, तेवढ्या निधीची तरतूद नसताना काम करणे हे चुकीचे नाही काय, यावर सचिव, जलसंधारण विभाग यांनी समितीस विशद केली की, यावर सचिव, मृद व जलसंधारण अधिकारी यांनी हे चुकीचे आहे असे उत्तर दिले.

यावर प्रधान सचिव ग्रामविकास विभाग यांनी समितीला पुढीलप्रमाणे माहिती दिली की, या प्रकरणामध्ये जी तरतूद होती त्यापेक्षा किती तरी पटीने जास्त खर्च केला गेला आहे. तो त्यांनी सेसच्या पैशातून खर्च केला. तसे करणे चुकीचे होते म्हणून मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना निलंबित केले गेले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची विभागीय चौकशी झाली ही विभागीय चौकशी दिनांक १९.१२.२०१८ रोजी बंद केलेली आहे. याबाबतचा अंतिम अहवाल ग्रामविकास विभागाला प्राप्त झालेला नाही. त्यावेळेस जे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.जवळेकर होते त्यांच्या विरोधात या व्यतिरिक्त केसेस सुरु आहेत. येथे निलंबित झाल्यानंतर ते गडचिरोली येथे गेले. तेथेही ते निलंबित झाले. सध्या ते सेवानिवृत्त झालेले आहेत. सदर केसच्या विभागीय चौकशीचा अहवाल आतापर्यंत मिळालेला नाही. परंतु, त्यांची विभागीय चौकशी दिनांक १९.१२.२०१८ रोजी पूर्ण केली.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, ज्या अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी झाली त्यामध्ये त्यांच्यावर जे जे आरोप होते त्यापैकी किती आरोप सिध्द झाले ? यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला विदित केले की, या आधारे जी विभागीय चौकशी झाली त्याचा अहवाल विभागाला आतापर्यंत प्राप्त झालेला नाही. दिनांक १९.१२.२०१८ रोजी विभागीय चौकशी संपलेली असून आता त्याचा अंतिम अहवाल प्राप्त होईल.

विभागीय चौकशी ही सर्वसाधारणपणे ६ महिन्यांत पूर्ण झाली पाहिजे, असे अपेक्षित आहे. सामान्यपणे निलंबनही त्या पेक्षा जास्त काळ ठेवता येत नाही कारण त्यांना त्या नंतर १५ टक्के वेतन द्यावे लागते. परंतु, अशा गंभीर प्रकरणामध्ये ६ महिन्यापेक्षा जास्त चालते.

तद्नंतर समितीने पुढीलप्रमाणे निदेश दिले की, या केसमध्ये श्री. जवळेकर हे ज्या ज्या जिल्हा परिषदेमध्ये गेले तेथे तेथे वारंवार अनियमितता, मोठ्या प्रमाणात पैशांच्या अफरातफरीचे प्रकरण होत आहेत. अशा केस संदर्भातील निर्णय हा जलद गतीने झाला पाहिजे. ६-१२ महिने, पुन्हा पूर्वपदावर नेमणे वगैरे गोष्टी होता कामा नयेत.

यावर सचिवांनी समितीला विदित केले की, आता ते अधिकारी सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांचे एक प्रकरण आपल्या समोर आहे. अजून ३-४ गंभीर प्रकरणे आहेत. अजून एका प्रकरणी त्यांनी जादा शिक्षक घेतले होते. परंतु, ते आता सेवानिवृत्त झालेले आहेत.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, शासनाचे एवढे प्रचंड नुकसान झालेले असताना श्री.जवळेकर यांचा २५ टक्क्यांचा विषय का घेतला? त्यांनी शासनाचे प्रचंड मोठ्या प्रमाणावर शासनाचे नुकसान केलेले आहे. हा २५ टक्क्यांचा निर्णय कोणता आधार घेऊन करण्यात आला? तसेच त्यांना पेन्शन लागू केल्यावर त्यांची विभागीय चौकशी सुरु केली आहे. ते नोकरीत असताना आरोप लागले होते. त्यामुळे त्यांची पेन्शन थांबवली पाहिजे होती. यावर प्रधान सचिव ग्रामविकास विभाग यांनी उत्तर दिले की, पेन्शन थांबवता येत नाही ८० टक्के प्रोव्हीजनल पेन्शन द्यावीच लागते. कारण जोपर्यंत दोषारोप सिध्द होत नाही तोपर्यंत त्यांना शासन करता येत नाही. त्याअनुषंगाने पुढे अशीही माहिती दिली की, त्यांची पेन्शन सुरु होण्यापूर्वीच त्यांची विभागीय चौकशी सुरु झालेली आहे. कधी कधी अशा केसेस आपल्या समोर आल्या असतील की, एखाद्या अधिकाऱ्यांना वाचविण्याकरिता जाणूनबुजून वेळकाढूपणा केला. परंतु, या प्रकरणाबाबत (केस) कमीत कमी या अधिकाऱ्यांबाबत अशी शक्यता नाही. यांनी विभागाला बदनाम केलेले आहे, ही वस्तुस्थिती आहे. यावर सचिव, महिला व बालविकास अधिकारी (अति.कार्यभार) यांनी विशद केले की, बाद, काढून टाकणे याबाबत अंतिमतः सर्व अधिकार हे सक्षम प्राधिकारी म्हणून संबंधित विभागाचे माननीय मंत्री किंवा मुख्यमंत्री महोदय यांना आहेत. त्यामुळे सचिवांनी एखादी नस्ती (फाईल) पाठविली तरी ती तशीच जशी आहे तशी संमत होईल असे नाही. एखाद्या वेळेस निलंबन प्रस्तावित केले तरी निलंबन होत नाही किंवा एखाद्या वेळेस नाही केले तरी होते. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विशद केले की, दोषारोप सिध्द झाला नाही म्हणून त्यांचे फक्त निलंबन झाले. पुढची कारवाई करण्यात आली नाही. यावर समितीने मत व्यक्त केले की, निलंबित झालेल्या अधिकाऱ्यांना प्रथम अर्धे वेतन दिले जाते, ६ महिन्यानंतर नंतर ३/४ वेतन देतो, वर्षानंतर त्यांना पूर्व पदावर नियुक्ती केली जाते. परंतु, त्यांना अकार्यकारी पदावर नियुक्ती दिली पाहिजे होती.

तद्नंतर समितीने बीड जिल्हा परिषदेमध्ये कार्यकारी अभियंता (बांधकाम) या पदाचा कार्यभार सध्या कोणाकडे आहे, असा प्रश्न पदाधिकाऱ्यांना विचारला असता सध्या कार्यकारी अभियंता (बांधकाम) हे पद रिक्त असून त्या पदाचा कार्यभार शाखा अभियंत्याकडे दिलेला आहे.

असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला सांगितले, यावर कार्यकारी अभियंता (बांधकाम) पद रिक्त असताना त्या पदाचा कार्यभार जलसंधारण विभागाच्या कार्यकारी अभियंत्याकडे देण्यात आला असता तरी योग्य होते. परंतु, जिल्हा परिषदेमध्ये कार्यकारी अभियंता (बांधकाम) पदाचा कार्यभार शाखा अभियंत्याकडे देण्यात आला याबाबत अशी समितीने नाराजी व्यक्त केली.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, कार्यकारी अभियंता पदाचा कार्यभार शाखा अभियंत्याकडे असणे ही वस्तुस्थिती योग्य नाही. या संदर्भात समितीची परवानगी असल्यास सदर पदासंबंधी निर्णय घेऊन शाखा अभियंता यांच्याकडून कार्यकारी अभियंता पदाचा कार्यभार काढता येऊ शकतो. सदर पदाचा कार्यभार त्यांच्या पदानंतर कार्यरत असलेल्या सर्वात ज्येष्ठ अधिकाऱ्याकडे दिला पाहिजे. तसेच कार्यभार देत असताना तो एक पदापेक्षा जास्त खालच्या स्तरामधील पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याकडे देता कामा नये अशा प्रकारचा निर्णय घेणे आवश्यक आहे.

यावर समितीने सचिवाना पुढीलप्रमाणे निदेश दिले की, सदर प्रकरणी चुकीच्या पध्दतीने सर्व कार्यवाही करण्यात आल्यामुळे या संदर्भात सखोल चौकशी करणे आवश्यक आहे. या बाबतीत नियमानुसार कार्यवाही न केल्यामुळे त्यात जे कोणी सहभागी आहेत ते कारवाईकरिता पात्र आहेत. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यकारी अभियंत्याच्या पदाचा कार्यभार देत असताना तपासणी करुन कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु तसे घडले नाही. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी फेब्रुवारी, २०१८ मध्ये कार्यभार स्वीकारुन १० महिन्यांचा कालावधी उलटून गेला आहे. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला विशद केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिकारात एक बाब होती की, त्यांनी विभागीय आयुक्त किंवा संबंधित विभाग किंवा संबंधित विभागाच्या प्रधान सचिवांकडे यासंबंधी विनंती करुन सांगावयास पाहिजे होते की, रिक्त असलेल्या कार्यकारी अभियंत्याच्या पदाचा कार्यभार संबंधित विभागामधील अधिकाऱ्यांकडे देण्यात यावा. परंतु तसे घडले नाही.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, विभागीय आयुक्तांची १ ते ७५ मुद्यांची निरीक्षण टिप्पणी असते त्यात यासंबंधी उल्लेख करण्यात आला होता का, यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खालीलप्रमाणे माहिती दिली की, याबाबतची माहिती सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही. सदर माहिती नंतर समितीला देतो. परंतु प्रत्येक निरीक्षण टिप्पणीमध्ये किती पदे रिक्त आहेत व त्यासाठी कशाप्रकारे प्रयत्न करण्यात यावेत संबंधी नमूद केलेले असते. परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अतिरिक्त कार्यभार देण्यासंबंधी प्रयत्न केलेला नाही. मी समितीला सांगू इच्छितो की, एका पदाचा कार्यभार दुसऱ्याकडे देण्यासंबंधी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जास्त स्वातंत्र्य नसते. ते यासंबंधी ग्रामविकास विभागाकडे अमुक अमुक अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत ती पदे भरण्याकरिता लाईन डिपार्टमेंट किंवा शासनाकडे विनंती करु शकतात. एक पदापेक्षा जास्त खालच्या पदावरील अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार देऊ नये. तसेच अशी परिस्थिती निर्माण झाल्यास त्यांनी लाईन डिपार्टमेंटच्या अधिकाऱ्यांकडे विनंती करावी. तसेच जिल्हा परिषदांकडे दुसरा पर्याय नसल्यास लाईन डिपार्टमेंटच्या अधिकाऱ्यांकडे कार्यभार देण्यासंबंधीचे अधिकार विभागीय अधिकाऱ्यांकडे देता येईल किंवा कसे याबाबत अभ्यास करुन यासंबंधीचा प्रस्ताव तयार करण्यात येईल. कारण याबाबतचे अधिकार ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिव स्तरावर नाहीत. ग्रामविकास विभाग यासंबंधी मुख्य सचिवांना विनंती करु शकते. यावर समितीने सचिवांना सुचना केल्या की, राज्य शासनाच्या वतीने संपूर्ण निरीक्षण करण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांकडे आहेत. लाईन डिपार्टमेंटच्या अधिकाऱ्यांना विभागीय अधिकारी नियंत्रित करु शकत नाही. त्यामुळे यासंबंधी ते शिफारस करणार आहेत. बांधकाम विभागातील एखादा कार्यकारी अभियंता महामार्गावर (हायवे) काम करीत असला तरी त्यांची आस्थापना एकच असते.

सचिव, (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, यांनी समितीला केलेल्या कार्यवाहीबाबत खुलासा पुढीलप्रमाणे विशेद केला. बीड जिल्हा परिषदेमध्ये सकृतदर्शनी गैरव्यवहार झाला हे समजल्यानंतर विभागीय आयुक्तांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला कळविले होते. त्यामुळे त्यावेळेस जे जे अधिकारी कार्यरत होते त्यांना निलंबित केले. श्री.एस.आर.शेंडे, कार्यकारी अभियंता यांना निलंबित केलेले आहे. त्यांनी बचावाचे निवेदन केले होते. त्यावर विचार करुन या संदर्भातील पुरावा घेऊन, मुख्य अभियंता यांना तपासणी करायला सांगून सार्वजनिक बांधकाम विभागाने श्री.शेंडे यांना त्यांचा काही दोष नाही म्हणून पुनर्स्थापित केले. सन २०१५ मध्ये त्यांना निलंबित केले व कामावर परत घेतले. त्यानंतर जिल्हा परिषदेने त्यांच्या विरुध्द चौकशीसाठी दिनांक १७ मे, २०१६ रोजी दोषारोप पत्र तयार करुन पाठविले. या दोषारोप पत्रांची छाननी केली तेव्हा असे लक्षात आले की, संबंधित दोषी नाहीत. ते दोषी नाहीत म्हटल्यावर किमान ते जेव्हा सेवेत होते आणि अनियमितता घडत होत्या, त्या तरी त्यांनी शासनाच्या निदर्शनास आणल्या पाहिजे होत्या या एका आरोपाखाली त्यांना ताकिद दिली. त्यानंतर ते सेवानिवृत्त झाले. या संदर्भात श्री.चंदनशीव, प्रभारी कार्यकारी अभियंता हे दोषी होते ते सेवानिवृत्त झाले होते. सेवानिवृत अधिकाऱ्या विरुध्द ४ वर्षांनंतर आपल्याला विभागीय चौकशी करता येत नाही. परंतु, गुन्हा दाखल करता येतो. त्यांच्या विरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला. श्री.सरक, उप अभियंता यांच्या विरुध्द सार्वजनिक बांधकाम विभागाने गुन्हा दाखल केला, अभियोग दाखल केला व विभागीय चौकशीची कारवाईही सुरु केली. अन्य कर्मचारी श्री.लांडगे वगैरे तसेच तत्कालीन शाखा अभियंता यांच्या विरुध्द जिल्हा परिषद कारवाई करीत आहे. या सर्वांच्या विरुध्द गुन्हा दाखल झालेला आहे. न्याय प्रविष्ट प्रकरण असले की, त्याचा निकाल लागेपर्यंत विभागीय चौकशीचे काही करता येत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाने करावयाची सर्व कारवाई केलेली आहे, याबाबत सचिवांनी असेही मत व्यक्त केले की, विभागीय चौकशीची कारवाई गुन्हा झाला की, त्यानंतर होईल. न्यायप्रविष्ट प्रकरणांबाबत शक्य तो लवकर ती बोर्डावर आणण्यासाठी प्रयत्न करावा व त्या निकाली निघीतून जे दोषी आहेत त्यांच्या विरुध्द गुन्हे दाखल केले आहेत. विभागीय चौकशीची कारवाई सुरु केली आहे. जे दोषी नाहीत त्यांनी हा घडलेला प्रकार शासनाच्या निदर्शनास आणला नाही म्हणून त्यांना ताकिद दिली व मुक्त केले आहे. ही काही चूक नसावी. यावर समितीने होकारात्मक संमती दर्शविली. तद्नंतर समितीने विचारणा केली की, श्री.वसंत तुळशीदास जाधवर यांच्या चौकशीबाबत आपण सांगू शकता काय, यावर सह सचिव, वित्त विभाग यांनी समितीस विदीत केले की, श्री.जाधवर यांना दिनांक २२.७.२०१५ रोजी निलंबित केले होते. त्यानंतर ६ महिन्यांनी त्यांना पुर्नस्थापित केलेले आहे. त्यांच्या विरुध्द दोषारोप पत्र बजावून दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी त्यांची विभागीय चौकशी सुरु केलेली आहे. विभागीय चौकशी अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे ती चौकशी सोपविण्यात आलेली आहे. त्यांनी १३ सुनावण्या घेतलेल्या आहेत. त्यामध्ये ४ साक्षीदार तपासण्याचे राहिलेले आहेत. दिनांक १९ व २० फेब्रुवारीला त्यांच्या सुनावण्या आहेत. तद्नंतर तत्कालीन प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.जवळेकर यांच्या प्रकरणाबाबतची सद्यःस्थिती सांगावी. अशी समितीने सचिवांना विचारणा केली असता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, मागच्या वेळेस सांगितले होते की, ते आधीच सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे. त्यांच्यावर दुसऱ्या केसेसमध्ये इतरही गंभीर आरोप आहेत. या केसमध्ये त्यांना निलंबित केले आहे तरी त्यांना ५० व ७५ टक्क्यांप्रमाणे वेतन दिले जाते. लाचलुचपत प्रतिबंधक प्रकरण असेल तर १ वर्ष प्रलंबित ठेवावे लागते नाही तर सर्वसाधारणपणे ६ महिन्यांनंतर निलंबन ठेवून त्यांना फक्त वेतन दिले जाते. परंतु, ही व्यक्ती जेथे गेली तेथे तसेच केले. आता ते सेवानिवृत्त झाले आहेत.

दिनांक ९ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांसमेवत झालेल्या साक्षीदरम्यान समितीने जलसंपदा विभागांच्या सचिवांना विचारणा केली की, तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री.बी.एच.गर्जे व श्री.एस.आर.कुलकर्णी यांच्याबाबत माहिती देण्यात याबाबतची सद्यःस्थिती सांगावी. यावर सचिव, (प्र व स), जलसंपदा विभाग यांनी समितीला विदीत केले की, श्री.एस.आर.कुलकर्णी, उप अभियंता यांच्या काळात अनियमितता घडली होती. व श्री.गर्जे यांचा प्रस्ताव त्यांनी आधी पाठवला होता. ग्रामविकास विभागाकडून आता जो प्रस्ताव प्राप्त झाला आहे त्यामध्ये श्री.गर्जे यांचे नाव वगळलेले आहे. त्यामध्ये फक्त श्री.एस.आर.कुलकर्णी यांचे नाव आहे. कारण श्री. गर्जे यांच्या काळात अनियमितता घडली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. यावर समितीने विचारणा केली की, विभागाने या प्रस्तावाला मान्यता दिली आहे काय, यावर सचिव, (प्र व स), जलसंपदा विभाग यांनी समितील विशद केले की, हा प्रस्ताव मंत्री महोदयांकडे दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी मान्यतेसाठी पाठविलेला आहे.

तद्नंतर समितीने महिला व बालविकास विभाग संदर्भात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सचिवाना विचारणा केली की, बीड जिल्हयामध्ये फॅब्रिकेटेड अंगणवाडया बांधण्याबाबत दि.१५ डिसेंबर, २०१७ रोजी झालेल्या शासन निर्णयानुसार कोणत्या लेखाशिर्षकाखाली बीड जिल्हयापुरता निर्णय घेण्यात आला आहे, तसेच बीड जिल्हयामध्ये १५० अंगणवाडया भाडयाने घेतलेल्या जागेमध्ये भरविण्यात येतात, फॅब्रिकेटेड अंगणवाडया कुचकामी व कुमकुवत असल्याने त्यासाठीचा निधी व्यपगत झाला आहे, या प्रकरणी महिला व बालविकास विभागाची भूमिका काय आहे, यावर सचिव, महिला व बालविकास विभाग (अति.कार्यभार) यांनी समितीस विशद केले की, हा विषय जिल्हा परिषदेशी निगडित आहे. महिला व बालविकास विभागाचे दोन कर्मचारी होते. त्यांची आस्थापना जलसंपदा विभागाकडे आहे. महिला व बालविकास विभागातर्फे जलसंपदा विभागाकडे पाठपुरावा करण्यात येईल.

तद्नंतर समितीने सचिवांना बीड जिल्ह्यातील अंगणवाड्यांबाबत विचारणा केली की, बीड जिल्हयात १५० अंगणवाडया भाडयाच्या जागेत आहेत, त्याबाबत जिल्हा परिषदेचे अभिप्राय काय आहेत, हा जो चौकशी अहवाल आहे त्यावर नियमानुसार प्रक्रिया केलेली नाही. कोणत्या लेखाशिर्षाचा निधी होता, त्याला महिला व बालकल्याण समितीने मंजुरी दिली होती का, समितीसमोर तपशील सादर केले होते का, तपशीलाप्रमाणे नमुने दाखविले होते का, त्याची तपासणी केली आहे का, महिला व बालकल्याण समितीने ते पाहिले होते का, यावर सहसचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीला विशद केले की, महिला व बालविकास विभागाकडे तांत्रिक मंजुरीसाठी प्रस्ताव येतो. त्याप्रमाणे प्रस्ताव आला, परंतु शासन स्तरावर मंजुरी दिलेली नाही. तसेच हा निधी खर्च केलेला नाही. निधी परत केलेला आहे, कारण त्याला शासनाची मंजुरी नाही. १२ जिल्हे होते, त्या सर्व जिल्हयांकडून महिला व बालविकास विभागाने निधी परत घेतला आहे. यावर निधी परत करण्यापेक्षा जून्या पध्दतीच्या नियोजनाप्रमाणे (टाईप प्लॅनप्रमाणे) अंगणवाडया का उभारल्या नाहीत, १२२ कोटी रुपये परत करणे हे विभागासाठी भूषणावह आहे का? अशी समितीने विचारणा केली असता, कक्ष अधिकारी, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, केंद्र शासनाची शॅडो तरतूद होती. त्यानुसार १२२ कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय (बजेट) तरतूद झाली होती. केंद्र शासनाने निधी न दिल्यामुळे महिला व बालविकास विभागाने सर्व जिल्हयांना रक्कम परत भरण्यास सांगितले, त्यानुसार सर्व जिल्हयांनी रक्कम परत केली. शॅडो तरतूद होती, त्यामुळे चुकीचे मंजुरी आदेश काढले होते.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायत राज समितीने दिनांक १०, ११, व १२ जानेवारी, २०१८ या कालावधीत बीड जिल्हा परिषदेला भेट दिली असता सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे बीड जिल्ह्यातील विधिमंडळ सदस्य व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनोपचारिक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आले की, बीड जिल्हा परिषदेमध्ये वित्त विभाग, जलसंधारण विभाग, बांधकाम विभाग, लघुपाटबंधारे विभाग या चार विभागातील तत्कालिन अधिकारी व पदाधिकारी यांनी संगनमताने गैरव्यवहार केल्यामुळे शासनाचे जवळपास रुपये ८० ते ९० कोटी नुकसान झालेले आहे तसेच बीड जिल्ह्यामध्ये फॅब्रीकेटेड अंगणवाड्या बांधण्याबाबत दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार बीड जिल्ह्यामध्ये १५० अंगणवाड्या भाड्याने घेतलेल्या जागेमध्ये भरविण्यात येतात. फॅब्रीकेटेड अंगणवाड्या कुचकामी व कमकुवत असल्याने त्यासाठीचा निधी व्यपगत झाला आहे याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

उपरोक्त प्रकरणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, बीड जिल्हा परिषदेमध्ये वित्त विभाग, जलसंधारण विभाग, बांधकाम विभाग आणि लघु पाटबंधारे विभाग या चार विभागातील तत्कालिन अधिकाऱ्यांच्या गैरव्यवहाराच्या संदर्भात माहिती घेत असताना जलसंधारण विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, जलसंधारण विभागाच्या कागदपत्रानुसार श्री.गर्जे व श्री.कुलकर्णी नावाचे दोन तत्कालिन कार्यकारी अभियंते कार्यरत असताना मूळ आक्षेप असा होता की, मूळ तरतूद रुपये दोन लाख होती वाढीव तरतूद रुपये ५५ लाख एवढी झाली. उपरोक्त कार्यकारी अभियंता यांनी त्या कामासाठी रुपये ३ कोटी ३१

लाखांची अतिरिक्त मान्यता दिली. याप्रकरणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी व सर्वसंबंधितांची एका विशेष लेखा परीक्षकांमार्फत चौकशी करण्यात आली व त्यानुसार त्यांचेविरुध्द दोषारोप दाखल केलेले आहेत. सदर प्रकरणामध्ये जी तरतूद होती त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त खर्च सेसच्या पैशातून केला गेला आहे. त्यामुळे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना निलंबित करण्यात आले. दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची विभागीय चौकशी बंद केलेली आहे. याबाबतचा अंतिम अहवाल ग्रामविकास विभागाला प्राप्त झालेला नाही. तत्कालिन प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.जवळेकर यांच्या विरोधात या व्यतिरिक्त केसेस सुरु आहेत. श्री.जवळेकर निलंबित झाल्यानंतर गडचिरोली येथे गेले तेथेही ते निलंबित झाले असून सध्या श्री.जवळेकर सेवानिवृत्त झालेले आहेत.

तसेच बीड जिल्हा परिषदेमध्ये कार्यकारी अभियंता (बांधकाम) हे पद रिक्त असल्यामुळे त्या पदाचा कार्यभार शाखा अभियंत्याकडे दिलेला आहे, हे योग्य नाही. याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. सदर पदाचा कार्यभार कार्यकारी (बांधकाम) अभियंता यांच्या पदानंतर कार्यरत असणाऱ्या सर्वात जेष्ठ अधिकाऱ्याकडे सोपविणे आवश्यक होते, कार्यभार देत असताना तो एका पदापेक्षा जास्त खालच्या स्तरामधील पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याकडे देता कामा नये असा निर्णय घेणे आवश्यक आहे. बीड जिल्हापरिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये सकृतदर्शनी गैरव्यवहार झाला असल्याचे दिसून आल्यामुळे, जे तत्कालिन अधिकारी कार्यरत होते त्यांना निलंबित केलेले आहे. कार्यकारी अभियंता श्री.एस.आर.शेंडे यांना निलंबित केलेले होते. तथापि, त्यांनी बचावाचे निवेदन केल्यावर मुख्य अभियंता यांनी तपासणी करायला सांगून सार्वजनिक बांधकाम विभागाने श्री.शेंडे यांचा दोष नाही त्यांना म्हणून त्यांना पुनर्स्थापित केले. त्यानंतर ते सेवानिवृत्त झाले. तसेच प्रभारी कार्यकारी अभियंता श्री.चंदनशीव सेवानिवृत्त झाले. चार वर्षानंतर विभागीय चौकशी करता येत नाही. परंतु, गुन्हा दाखल करता येतो. श्री. चंदनशिव प्रभारी कार्यकारी अभियंता यांचे विरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल आहे. त्याचप्रमाणे उपअभियंता श्री.सरक, अन्य कर्मचारी श्री.वांडगे वगैरे तत्कालिन शाखा अभियंता यांचेविरुध्द जिल्हा परिषद कारवाई करीत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच बीड जिल्हा परिषदेचे तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.वसंत जाधवर यांना दिनांक २२ जुलै, २०१५ रोजी निलंबित करण्यात आले होते. त्यानंतर सहा महिन्यांनी त्यांना पुनर्स्थापित करण्यात आले होते. श्री.जाधवर यांचेविरुध्द दोषारोप पत्र बजावून दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी विभागीय चौकशी विभागीय चौकशी अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे सोपविण्यात आलेली आहे. तपासणीचे काम अद्याप अपूर्ण आहे.

बीड जिल्हा परिषदेच्या जलसंपदा विभागाचे तत्कालिन कार्यकारी अभियंता श्री.एस.आर.कुलकर्णी यांच्या काळात अनियमितता घडली होती व श्री.गर्जे यांचा प्रस्ताव आधी पाठविलेला होता. ग्रामविकास विभागाकडून जो प्रस्ताव प्राप्त झाला आहे त्यामध्ये श्री.गर्जे यांचे नाव वगळलेले आहे. त्यामध्ये फक्त श्री.एस.आर.कुलकर्णी यांचे नाव आहे. श्री.गर्जे यांच्या काळात अनियमितता घडली नाही श्री.कुलकर्णी यांचा प्रस्ताव जलसंपदा मंत्री यांचेकडे दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी मान्यतेसाठी पाठविलेला आहे. सदर प्रकरणी घेण्यात आलेल्या निर्णयाची माहिती समितीला एक महिन्याच्या आत कळविण्यात यावी, **तसेच बीड जिल्हा परिषदेच्या वित्त विभाग, जलसंधारण विभाग, बांधकाम विभाग आणि लघुपाटबंधारे विभागामध्ये झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी तत्कालिन संबंधित अधिकारी यांचेविरुध्द सुरु असलेली चौकशी व तपासणी तसेच मा.जलसंपदा मंत्री महोदयांकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावावरील कार्यवाही पूर्ण करुन संबंधित तत्कालिन अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द शासन नियमानुसार केलेल्या कारवाईची माहिती समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

तसेच बीड जिल्ह्यामध्ये फॅब्रिकेटेड अंगणवाड्या बांधण्याबाबत दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी बीड जिल्ह्यापुरता शासना निर्णय घेण्यात आला आहे. बीड जिल्ह्यामध्ये १५० अंगणवाड्या भाडयाने घेतलेल्या जागेमध्ये भरविण्यात येतात. फॅब्रिकेटेड अंगणवाड्या कुचकामी व कमकुवत असल्याने त्यासाठीचा निधी व्यपगत झाला असल्याचा आक्षेप ठेवण्यात आला होता. तथापि, अंगणवाडीसाठी प्राप्त झालेल्या निधीबाबत महिला व बालविकास विभागाने समितीसमोर विदीत केले की, महिला व बालविकास विभागाकडे तांत्रिक मंजुरीसाठी प्रस्ताव येतो त्याप्रमाणे प्रस्ताव आला परंतु, शासन स्तरावर मंजुरी दिलेली नाही. तसेच सदर निधी खर्च केलेला नसून परत केलेला आहे, कारण त्याला शासनाची मंजुरी नव्हती. १२ जिल्हे होते त्या सर्व जिल्ह्यांकडून महिला व बालविकास विभागाने रुपये १२२ कोटी एवढा निधी परत घेतला आहे, ही बाब महिला व बालविकास विभागासाठी भूषणावह नाही. **केंद्र शासनाने निधी न दिल्यामुळे महिला व बालविकास विभागाने सर्व जिल्ह्यांना रक्कम परत भरण्यास सांगितली, त्यानुसार सर्व १२ जिल्ह्यांनी रक्कम परत केली. यासंबंधी चुकीचे मंजुरी आदेश काढल्याप्रकरणी महिला व बालविकास विभागाने बीड जिल्ह्यामध्ये १५० अंगणवाड्या भाड्याने घेतलेल्या जागेमध्ये भरविण्यात येत असून फॅब्रिकेटेड अंगणवाड्या कुचकामी व कमकुवत असल्याप्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.**

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, बीड (प्रशासन)

### प्राथमिक आरोग्य केंद्र, नायगाव, ता.पाटोदा, जि. बीड

पंचायती राज समितीने दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, नायगाव, ता.पाटोदा, जि. बीड येथे भेट दिली असता भेटीच्या दरम्यान समितीस प्राथमिक आरोग्य केंद्रातील तसेच डॉक्टर व स्टाफ नर्स यांचे शौचालय बंद व निकृष्ट अवस्थेत आढळून आले. तेथील केंद्रामध्ये कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यात येते परंतु तेथे लाईट नसल्याने बंद असल्याचे आढळून आले. प्राथमिक आरोग्य केंद्रातील दुरध्वनी बंद असल्याचे आढळून आले. प्रसुतीगृहातील छताचे प्लास्टर पडल्याचे आढळून आले, डॉक्टर व स्टाफ नर्स यांच्या निवासस्थानाच्या छतामधून पावसाळ्यामध्ये पाणी गळती होते, एका कक्षामधील लाद्या निघाल्याचे आढळून आले, प्राथमिक आरोग्य केंद्र व निवासस्थानांची दुरुस्ती करण्याबाबत केवळ एक वेळा सार्वजनिक बांधकाम विभागास पत्राद्वारे विनंती केल्याचा पत्रव्यवहार आढळून आला, प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्ण कल्याण समितीच्या रोख पुस्तिकेमध्ये २ लाख रुपये रक्कम उपलब्ध असताना तिचा वापर आरोग्य केंद्राच्या दुरुस्तीसाठी करण्यात आला नसल्याचे आढळून आले, कार्यवृत्ताच्या नोंदवहीमध्ये दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या सभेची बोगस नोंद घेतल्याचे व त्यावर तालुका आरोग्य अधिकारी यांची स्वाक्षरी नसल्याचे आढळून आले, आरोग्य केंद्रामध्ये शेवटची शस्त्रक्रिया दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी करण्यात आली असून त्यानंतर ग्रामीण रुग्णालय, पाटोदा येथे सर्व रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात आल्याची माहिती आरोग्य केंद्र प्रशासनाने दिली, प्राथमिक आरोग्य केंद्रातील कॅशबुकमध्ये माहे सप्टेंबर, २०१२ पर्यंत नोंदी घेतल्याचे आढळून आले. उक्त सर्व कारणास्तव तालुका आरोग्य अधिकारी व आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांना निलंबित करण्याची शिफारस समितीने केली.

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या देखभाल दुरुस्तीचे काम मागील ३ वर्षामध्ये केले नसल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता व शाखा अभियंता यांनी दिली. सार्वजनिक बांधकाम विभागाने प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दुरुस्तीचे काम मंजूर असताना निधी अभावी केले नाही. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या देखभाल व दुरुस्ती संबंधीच्या प्रश्नांचे उत्तर शाखा अभियंता व उप अभियंता यांना समाधानकारक देता न आल्याने त्यांना निलंबित करण्याची शिफारस समितीने केली.

गट विकास अधिकारी यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रास एकदाही भेट दिली नसल्याचे उपलब्ध दस्तऐवजावरुन आढळून आले. प्राथमिक आरोग्य केंद्रातील दोन बायोमेट्रीक उपस्थिती मशीन बंद असल्याचे आढळून आले. दोन पैकी एका आधारबेस बायोमेट्रीक उपस्थिती मशीनची खरेदी रुग्ण कल्याण निधीतून केली असल्याचे दस्तऐवजावरुन आढळून आले. उक्त कल्याण निधीतून सदरहू खरेदी करता येते का, याबाबतचा प्रश्न निर्माण झाल्याने याप्रकरणी विभागाच्या सचिवांची साक्ष आयोजित करण्यात यावी, असे गट प्रमुखांनी निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

प्राथमिक आरोग्य केंद्र, नायगाव ता.पाटोदा, जि.बीड येथील दुरूस्तीचे काम मंजूर असताना देखील सार्वजनिक बांधकाम विभागाने मागील ३ वर्ष सदर आरोग्य केंद्राची दुरूस्ती न करण्याची कारणे काय आहेत, तसेच उक्त केंद्रातील दोनपैकी एक आधारबेस बायोमेट्रिक उपस्थिती मशिनची खरेदी रूग्णकल्याण निधीतून करण्याची कारणे काय आहेत, उपरोक्त दोन्ही प्रकरणी चौकशी करून त्यानुसार संबंधीतांविरूध्द जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

प्राथमिक आरोग्य केंद्र, नायगाव जि.बीड येथे पंचायती राज समितीच्या सदस्यांनी दिनांक १० ते १२ जानेवारी, २०१८ रोजी भेट दिली. वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र, नायगाव यांनी दिनांक १७ जुलै, २०१७ च्या पत्रानुसार मुख्य इमारत व क्वार्टर दुरुस्ती बाबत जिल्हा आरोग्य अधिकारी, बीड कार्यालयाला पत्र दिलेले आहे. सदर जिल्हा आरोग्य अधिकारी, बीड यांनी दिनांक १८ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या आरोग्य समितीमधील ठराव क्र.२६ नुसार जिल्हा परिषद स्वतःच्या झेडपीआर उत्पन्नातून रूपये २.५० लक्ष निधीची तरतुद मंजूर करून घेऊन दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बीड बांधकाम विभाग क्र.१ यांच्या पत्रानुसार मे.गजानन मजूर सहकारी संस्था मर्या. काकडहिरा, मु.पो. काकडहिरा, ता.पाटोदा, जि.बीड यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत व बांधकाम विभागामार्फत शस्त्रक्रियागृह, छतगळती, ए.एन.एम., एल.एच.व्ही, औषध निर्माण अधिकारी निवासस्थान, संडास बाथरुम दुरुस्ती करण्यात आलेली असून प्राथमिक आरोग्य केंद्राचे काम सुरळीतपणे सुरु आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कामकाजाची माहिती खालील प्रमाणे

| अ.क्र. (१) | निर्देशांक (२) | सन २०१६-१७ (३) | सन २०१७-१८ (४) | माहे नोव्हेंबर, २०१८ अखेर (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | ओ.पी.डी. | ८३०४ | ७६६२ | ८१८३ |
| (२) | आय.पी.डी. | ४८३ | ४४१ | ४८१ |
| (३) | प्रसुती | ७४ | ५८ | ४७ |
| (४) | कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया | १७९ | १५७ | ९२ |

प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी तसेच कर्मचारी वेळेवर उपस्थित राहून सेवा देतात किंवा कसे याची पडताळणी होणे आवश्यक असल्याची बाब विविध लोकप्रतिनिधींनी उपस्थित केल्यामुळे शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, दिनांक २३ मार्च, २०१६ दिनांक ७ एप्रिल, २०१६ व दिनांक १० जून, २०१६ व दिनांक २३ जून, २०१६ नुसार आरोग्य संस्थांच्या ठिकाणी बायोमेट्रीक उपस्थिती नोंदविणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यासाठी बायोमेट्रीक मशीन खरेदी आवश्यक होते म्हणून सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी बायोमेट्रीक मशीन खरेदी रुग्ण कल्याण समितीच्या निधीतून करण्याच्या सुचना जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचे पत्र जा.क्र./जिपबी/आखा/बायोमेट्रीक/कावि-५०५/ २०१७ बीड क्र.२३९ दिनांक २३ ऑगस्ट, २०१७ नुसार देण्यात आल्या. त्यानुसार वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, नायगाव, जि.बीड यांनी शासनाच्या खरेदी धोरणाबाबतच्या उद्योग व ऊर्जा विभागाच्या दिनांक १ डिसेंबर, २०१६ रोजीच्या अधिन राहून विहित पध्दतीने बायोमेट्रीक मशीनची खरेदी केली असून रुपये १५,०००/- चे देयक दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी अदा केलेले आहे. सदर मशीन सद्यःस्थितीत सुस्थितीत सुरु आहे व त्यानुसार अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यात येत आहे.

**आरोग्य संचालनालयाचे अभिप्राय :-** जिल्हा आरोग्य अधिकारी, बीड यांच्या अभिप्रायाशी आरोग्य संचालनालय सहमत आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय :-** शासन सहमत आहे

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने बीड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, प्राथमिक आरोग्य केंद्र, नायगाव, ता.पाटोदा, जि.बीड येथील दुरुस्तीचे काम मंजूर असताना देखील सार्वजनिक बांधकाम विभागाने मागील तीन वर्षे सदर आरोग्य केंद्राची दुरुस्ती न करण्याची कारणे काय आहेत, तसेच उक्त केंद्रातील दोनपैकी एक आधारबेस बायोमेट्रीक उपस्थिती मशीनची खरेदी रुग्ण कल्याण निधीतून करण्याची कारणे काय आहेत, उपरोक्त दोन्ही प्रकरणी चौकशी करुन त्यानुसार संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन कोणती कारवाई करण्यात आली आहे, यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, पहिला मुद्दा जिल्हापरिषदेशी संबंधित आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, आरोग्य केंद्राच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झालेले आहे. दुसरा मुद्दा बायोमेट्रीक मशीन खरेदी संदर्भातील आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, सन २०१६-२०१७ मध्ये राज्य शासनाने आदेश दिले होते की, प्रत्येक कार्यालयात बायोमेट्रीक मशीन लावणे आवश्यक आहे. त्यानुसार सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी बायोमेट्रीक मशीन खरेदी रुग्ण कल्याण समितीच्या निधीतून करण्यात आली. या खरेदीमध्ये गैरव्यवहार झालेला नाही आणि आजही मशीन चालू आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, कर्मचाऱ्यांनी कार्यालयात वेळेवर उपस्थित रहावे यासाठी बायोमेट्रीक मशीन लावण्यात आले. कर्मचारी वेळेवर उपस्थित राहिले तरी ते कार्यालयीन वेळेत काम करतात किंवा कसे याची माहिती घेतली काय, कर्मचाऱ्यांकडून दैनिक टिपण घेतल्या काय, कर्मचाऱ्यांनी दिवसभर काम केले किंवा कसे याची आपणास माहिती कशी मिळेल, आपण फक्त बायोमेट्रीक मशीन लावले. एका मशीनची किंमत १५ हजार रुपये आहे. एका मशीनमागे पाच हजार रुपये कमिशन आहे. सर्व विभागांमध्ये या मशीन बसविलेल्या आहेत. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, कर्मचाऱ्यांनी वेळेवर कार्यालयात उपस्थित रहावे यासाठी ही मशीन लावण्यात आलेली आहे. जर एखादा कर्मचारी वेळेवर हजर राहिला आणि आपण म्हणता त्याप्रमाणे काही काम केले नाही. समितीने विचारणा केली की, रोहयोच्या कामावर गावातील मजूर काम करतात. तेथेही बायोमेट्रीक मशीन लावावी. मजूर सकाळी कामावर उपस्थिती लावून घरी जाईल आणि पुन्हा संध्याकाळी ६.०० वाजता उपस्थिती लावेल. त्याने उपस्थिती लावली असल्यामुळे त्याला दिवसाची मजुरी देणार काय, आपण तेथे असे करीत नाही. आपण त्याच्या कामाचे मोजमाप करता. त्याप्रमाणे सरकारी कर्मचाऱ्यांच्या कामाचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. बायोमेट्रीक मशीन वर्ग-३ आणि वर्ग-४ मधील

कर्मचाऱ्यांसाठी लावलेली आहे. कर्मचारी आपली उपस्थिती लावतो परंतु तो दिवसभर काम करतो किंवा कसे याचे मोजमाप कसे करता, आपण कर्मचाऱ्यास महिन्याच्या महिन्याला पगार देत असतो. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, यामुळे १०० टक्के प्रश्न सुटणार नाही. परंतु कामाचे मोजमाप झाले पाहिजे.

समितीने विचारणा केली की, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वर्ग-३ आणि वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवले पाहिजे, परंतु तसे होत नाही. वरिष्ठ अधिकारी कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यास कमी पडले म्हणून बायोमेट्रीक मशीनची गरज पडली. मंत्रालयात देखील बायोमेट्रीक मशीन लावण्याची आवश्यकता पडली कारण सचिव सकाळी १०.०० वाजता कार्यालयात उपस्थित झाले नाहीत. तेव्हा कर्मचाऱ्यांच्या दैनिक टिपण (डेली नोट्स) कार्यसूची हे पाहण्याची जबाबदारी ज्या नियंत्रण अधिकाऱ्याकडे आहे ते त्यांचे काम सक्षमपणे पार पाडत नाही. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, तशा सूचना निर्गमित करण्यात येतील.

समितीने विचारणा केली की, आपण दैनिक टिपण तपासून त्या कर्मचाऱ्यास पगार मंजूर करता काय, लेखा आक्षेप आल्यानंतर त्या कर्मचाऱ्यावर जबाबदारी निश्चित करता, खरे म्हणजे कार्यालय प्रमुखावर जबाबदारी निश्चित झाली पाहिजे कारण त्या कर्मचाऱ्याचे काम चांगले होते म्हणून त्या कर्मचाऱ्यास पगार मंजूर केला. जर काम चांगले नव्हते तर पगार कसा मंजूर केला, यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, कर्मचाऱ्यांनी कार्यालयात वेळेवर उपस्थित राहून काम केले पाहिजे.

समितीने निदेश दिले की, या प्राथमिक आरोग्य केंद्रामधील कर्मचाऱ्यांची उपस्थिती बायोमेट्रीक मशीनवर तपासून त्यांनी कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर काम केले किंवा कसे याची देखील तपासणी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्यात सादर करावा.

## अभिप्राय व शिफारशी

**पंचायती** राज समितीने दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, नायगाव. ता.पाटोदा, जि.बीड येथे भेट दिली असता भेटीच्या दरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, प्राथमिक आरोग्य केंद्रातील शौचालय बंद व अत्यंत निकृष्ट अवस्थेत आढळून आले ज्याठिकाणी कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यात येते. त्याठिकाणी विद्युत पुरवठा नसल्याने शस्त्रक्रीया गृह बंद अवस्थेत आढळून आले दूरध्वनि संच बंद असून प्रसुतीगृहातील छताचे प्लास्टर पडलेले होते. डॉक्टर व स्टाफ नर्स यांच्या निवासस्थानाच्या छतामधून पावसाळ्यामध्ये पाणी गळती होते. लादया निघाल्याचे आढळून आले, प्राथमिक आरोग्य केंद्र व निवासस्थानांची दुरुस्ती करण्याबाबत केवळ एकदाच सार्वजनिक बांधकाम विभागास पत्राद्वारे विनंती केल्याचा पत्रव्यवहार आढळून आला व मागील ३ वर्षामध्ये देखभाल दुरुस्तीचे काम करण्यात आलेले नाही. दुसरी आश्चर्याची बाब म्हणजे प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्ण कल्याण समितीच्या रोख पुस्तिकेमध्ये रुपये दोन लाख एवढी रक्कम उपलब्ध असताना देखील सदर रकमेचा वापर आरोग्य केंद्राच्या दुरुस्तीसाठी करण्यात आला नव्हता. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

नायगांव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यवृत्ताच्या नोंदवहीमध्ये दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या सभेची बनावटरित्या नोंद घेतलेली होती सदर कार्यवृत्तावर तालुका आरोग्य अधिकारी यांची स्वाक्षरी नसल्याचे आढळून आले. सदर आरोग्य केंद्रामध्ये शेवटची शस्त्रक्रिया दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी करण्यात आली असून उक्त तारखेनंतर शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या सर्व रुग्णांना ग्रामीण रुग्णालय, पाटोदा येथे पाठविण्यात येत आहे. त्यामुळे रुग्णाच्या आरोग्याची अतिशय हेळसांड होत असून तालुका आरोग्य अधिकारी व आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांचा बेजबाबदारपणा दिसून येत आहे व कर्तव्यात कसूर होत असल्याप्रकरणी समिती तीव्र खेद व्यक्त करीत आहे.

गटविकास अधिकारी यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रास एकदाही भेट दिली नसल्याचे आढळून आले. तसेच दोन बायोमेट्रीक उपस्थिती यंत्र बंद असल्याचे आढळून आले सदर दोन बायोमेट्रीक यंत्रापैकी एका आधार बस बायोमेट्रीक उपस्थिती यंत्राची खरेदी रुग्ण कल्याण निधीतून केल्याचे दस्ताऐवजातून आढळून आले. याप्रकरणी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, बायोमेट्रीक यंत्रे खरेदीमध्ये गैरव्यवहार झालेला नसून बायोमेट्रीक यंत्रे व्यवस्थितरित्या सुरु आहेत. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झालेले आहे. तथापि, **प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्ण कल्याण समितीच्या रोख पुस्तिकेमध्ये रुपये दोन लक्ष एवढी रक्कम उपलब्ध असताना देखील दुरुस्ती करण्यात न आल्या प्रकरणी व शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांना ग्रामीण रुग्णालय पाटोदा येथे पाठविल्या प्रकरणी सर्व संबंधितांची चौकशी करून चौकशीत दोषी आढळल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे व त्यानुसार संबंधितावर केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, बीड (प्रशासन)

### बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये पाटोदा पंचायत समितीचे सन २०१३-१४ पासून रूपये ७ कोटी ५८ लाख बँकेच्या खात्यामध्ये अडकून पडले असल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी पंचायत समिती,पाटोदा येथे भेट दिली होती. भेटी दरम्यान सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेच्या अनुषंगाने बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समितीचे सन २०१३-१४ या वर्षाचे बाबनिहाय उत्पन्न किती होते व उक्त वर्षात कोणकोणत्या बाबीवर किती खर्च झाला, सन २०१७ अखेर पंचायत समितीकडे किती रक्कम शिल्लक होती व रक्कम शिल्लक राहण्याची कारणे काय आहेत, यावर गट विकास अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, लेखाशीर्ष-३, शिक्षण यासाठी १ लाख रुपये तरतूद करण्यात आली होती.

समितीने विचारणा केली की, माहे मार्च, २०१७ अखेर १३,३५,७०३ रुपये शिल्लक असून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा पाटोदा येथील खात्यामध्ये ३,५३,६८७ रुपये शिल्लक दिसून येत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात रक्कम शिल्लक राहण्याची कारणे काय, यावर गट विकास अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेमध्ये १३.३५ लाख रुपये रक्कम रखडलेली आहे.

पुढे समितीने विचारणा केली की, आजही सदरहू रक्कम बँकेच्या खात्यामध्ये रखडलेली आहे काय, यावर वरिष्ठ सहायक लेखाधिकारी यांनी समितीस विशद केले की, सदरहू रक्कम बँकेच्या खात्यामध्ये आहे. पुढे समितीने विचारणा केली की, सदरहू रक्कम वसूल करण्यासंबंधी न्यायालयामध्ये दावा दाखल केला नाही काय, यावर वरिष्ठ सहायक लेखाधिकारी यांनी समितीस विशद केले की, त्याबाबतचा अधिकार पंचायत समितीस्तरावर नाही.

समितीन विचारणा केली की, वेगवेगळ्या लेखाशिर्षाखालील किती रक्कम बँकेत अडकून आहे, यावर वरिष्ठ सहायक लेखाधिकारी यांनी समितीस विशद केले की, १३.३५ लाख रुपये रक्कम अडकलेली आहे. समितीने विचारणा केली की, सदरहू रक्कम केव्हापासून बँक खात्यामध्ये अडकून पडलेली आहे, यावर वरिष्ठ सहायक लेखा अधिकारी यांनी समितीस विशद केले की, सन २०१३-१४ पासून रक्कम अडकून पडलेली आहे.

समितीने विचारणा केली की, सदरहू वसूली प्रकरणी सभागृहामध्ये चर्चा करुन व विधि अधिकारी यांचेशी चर्चा करुन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेविरुध्द दावा दाखल करण्यात आला आहे काय, यावर वरिष्ठ सहायक लेखाधिकारी यांनी समितीस नाही असे उत्तर दिले. समितीने विचारणा केली की, उक्त वसूली प्रकरणी दावा दाखल का करण्यात आला नाही, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अडकलेल्या ७ कोटी ५८ लाख रुपये वसूली प्रकरणी दावा दाखल करुन त्या बँकेच्या इमारतीची जप्ती करता येईल. यावर वरिष्ठ सहायक लेखा अधिकारी यांनी समितीस विशद केले की, बँकेत अडकलेल्या रकमेमध्ये वेतन व भत्त्याचा निधी देखील समाविष्ट आहे.

समितीने विचारणा केली की, उक्त पैसे अडकल्याने कर्मचाऱ्यांचे वेतन रखडले आहे, हे सिध्द होते. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विशद केले की, डीसीसी बँकेमध्ये अडकलेल्या पैशांच्या संदर्भात समितीने काल घेतलेल्या बैठकीमध्ये चर्चा झाली आहे. उक्त बँकेत सुमारे १७५ कोटी रुपये निधी अडकलेला आहे. या रकमेमध्ये पंचायत समितीच्या अडकलेल्या रकमेचाही समावेश आहे. सदरहू रक्कम रिलीज करण्यासंदर्भात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चेअरमन यांची भेट घेतली आहे, पत्रव्यवहार करुन विनंती केली आहे. यावर समितीने निदेश देत विचारणा केली की, उक्त रक्कम रिलीज करण्याबाबत डीसीसी बँकेने काही लेखी दिले आहे काय, सन २०१३-१४ पासून ७ कोटी ५८ लाख रुपये बँकेच्या खात्यामध्ये अडकून पडलेले आहेत. सदरहू विषय जिल्हा परिषद अध्यक्ष यांचेमार्फत सर्वसाधारण सभेच्या बैठकीमध्ये ठेवायला पाहिजे होता. सदरहू अडकलेल्या रकमेचे व्याज आतापर्यंत १५ कोटी रुपये मिळाले असते. सदरहू प्रकरणी बँकेची मालमत्ता विकून रक्कम वसूली करावयास पाहिजे होती. जिल्हा परिषद प्रशासन राजकीय दबावाला बळी पडल्याने संपूर्ण जिल्हा परिषदेचे नुकसान होत आहे. सदरहू वसूली प्रकरणी कोणत्याही प्रकारचे प्रयत्न करण्यात आले नाही. त्यामुळे उक्त प्रकरणी वित्त व सहकार विभागाच्या सचिवांची साक्ष लावण्यात यावी. व सदरहू रक्कम डीसीसी बँकेत अडकल्यानंतरच्या कालावधीत कोणत्या बँकेत रक्कम ठेवण्यात येत आहे, यावर वरिष्ठ सहायक लेखाधिकारी यांनी समितीस विशद केले की, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद बँकेच्या शाखेमध्ये ठेवण्यात येत आहे. समितीने निदेश दिले की, याप्रकरणी विधि अधिकारी यांचेशी चर्चा करावी व सदरहू विषय जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत चर्चेसाठी ठेवण्यात यावा व डीसीसी बँकेविरुध्द दावा दाखल करण्यात यावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकमध्ये पाटोदा पंचायत समितीचे सन २०१३-१४ पासून रूपये ७ कोटी ५८ लाख बँकेच्या खात्यामध्ये अडकून पडले असून सदरहू रक्कमेच्या वसुली प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायती राज समितीने दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी पंचायत समिती पाटोदा याकार्यालयास भेट दिली असता पंचायत समिती पाटोदा या कार्यालयाचे जिल्हामध्यवर्ती बँकमध्ये असलेली शिल्लक रक्कमे बाबत मा.विभागीय सचिवांच्या साक्षीसाठीच्या प्रश्नावली मधील प्रश्नास अनुसरुन (उत्तर) अनुपालन सादर करण्यात येते की, जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा पाटोदा या शाखेत पंचायत समिती पाटोदा याकार्यालयाचे पाच बँक खाते असुन सदरील शिल्लक रक्कमे बाबत शाखेस वेळोवेळी प्रत्यक्ष भेटी दिलेल्या आहेत. तसेच सदर अडकलेली रक्कम बँकेकडून परत मिळणे बाबत वेळोवेळी पत्राद्वारे व बँकेला समक्ष भेटून पाठपुरावा केलेला आहे.

सदरचा अडकलेला निधी परत मिळणेसाठी विधीज्ञ यांच्या मार्फत न्यायालयीन कार्यवाही करण्यात येत आहे. सदरील रक्कम बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून परत मिळणेसाठी मा.उच्च न्यायालयामध्ये दावा दाखल करण्याची कार्यवाही चालु आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**सहकार विभागाचे अभिप्राय :-** दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ अखेर पाटोदा पंचायत समितीचा रुपये ७.६३ कोटी इतका निधी विविध खात्यावर शिल्लक आहे. बँकेकडील पाटोदा पंचायत समितीचा निधी परत करणे बाबत बँकेद्वारे वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-३) जिल्हा परिषदांचा जिल्हा मध्यवर्ती बँकेत अडकलेला निधी परत मिळण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याची विनंती करणारी पत्रे ग्रामविकास विभागाकडून सहकार विभागास पाठविण्यात आली आहेत. याबाबत वारंवार पाठपुरावा करुन दिनांक ३ डिसेंबर, २०१४, दिनांक १९ जानेवारी, २०१५ व दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी अर्ध शासकीय पत्रे सहकार विभागास पाठविण्यात आली आहेत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने बीड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, बीड जिल्हा परिषदेने बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये सहकारी बँकेत अडकलेले रुपये १७४ कोटी वसूल करण्यासाठी कोणती कार्यवाही केलेली आहे. तसेच या रक्कमेमध्ये पाटोदा पंचायतीचे सन २०१३-१४ पासून रुपये ७ कोटी ५८ लाख देखील समाविष्ट आहेत. जिल्हा परिषदेची एवढी मोठी रक्कम रुपये १७४ कोटी बँकेकडे ठेव स्वरुपात असताना बँकेकडून हमी का घेतली नाही, यावर प्रधान सचिव, सहकार विभाग यांनी खुलासा केला की, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे सध्या १९५ कोटी रुपये शिल्लक आहेत. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, बँकेकडून हमी घेण्याची पध्दत नव्हती. आतापर्यंत बँक अस्तित्वात आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शासनाचे त्यावेळी असे निदेश होते की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत रक्कम जमा करावी. अगोदरपासून निधी जिल्हा मध्यवर्ती बँकेत जमा असायचा. २०११ मध्ये ही अडचण आली.

तद्नंतर प्रधान सचिव, सहकार विभाग यांनी खुलासा केला की, बँकेची आर्थिक स्थिती चांगली नाही, थकबाकी मोठी आहे. मागील ५-६ वर्षे दुष्काळाची परिस्थिती होती. त्यामुळे थकबाकी वसूल झालेली नाही. जी रक्कम वसूल झाली त्यातून त्यांनी मोठया प्रमाणात वैयक्तिक ठेवी परत केलेल्या आहेत. त्यांच्या संस्थात्मक ठेवी, अर्बन बँका, सहकारी संस्था आणि जिल्हा परिषदेच्या ठेवी होत्या. आतापर्यंत त्यांनी ३९५ कोटी रुपयांच्या वैयक्तीक ठेवी परत केल्या आहेत. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन विभागाने परिपत्रक निर्गमित केले होते. त्यानुसार सक्तीच्या वसुलीला स्थगिती दिली आहे. जोपर्यंत वसुली होत नाही तोपर्यंत ते रक्कम परत देऊ शकणार नाहीत.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, वसुलीची जबाबदारी बँकेची आहे. शासनाच्या निर्देशानुसार जिल्हा परिषदेने बँकेमध्ये ठेव म्हणून रक्कम ठेवली होती, ती रक्कम वसूल करुन देण्याची जबाबदारी सहकार विभागाची आहे. जिल्हा परिषदेने वसुलीसाठी मा.उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. कारण त्यांना शासन मदत करण्यास तयार नाही. शासन म्हणून आपली जबाबदारी आहे, त्यांची रक्कम वसूल करुन दिली पाहिजे. हायकोर्टाचा निर्णय येईपर्यंत वाट पाहणे हे बरोबर नाही. तसेच बँकेला ठेव निधीतील ७५ टक्के निधी वापरता येतो, परंतु चालू खात्यातील निधी वापरता येत नाही. यावर प्रधान सचिव, सहकार विभाग यांनी खुलासा केला की, सहकार न्यायालयाचा निकाल आला तर सेक्शन १५६ खाली विशेष वसुली अधिकारी नेमता येतो. जिल्हा परिषदेने न्यायालयात एक याचिका दाखल केली आहे. वसुली होईल त्यामधून शासन निधी परत करणार आहे.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, संपूर्ण राज्यातील एका वर्षापूर्वीची आकडेवारी साधारणत: ६६० कोटी रुपये होती. नंदुरबार, नागपूर अशा वेगवेगळ्या जिल्हा परिषदांचे पैसे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत होते. अमरावती जिल्हा परिषदेला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून पैसे काढून ते स्टेट बँक ऑफ इंडिया किंवा राष्ट्रीयकृत बँकेत ठेवावेत असे सांगितले. परंतु, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष किंवा इतर पदाधिकाऱ्यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून रक्कम काढून घेऊ नये. कारण बँकेतून पैसे काढून घेतले तर बँकेच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम होईल असे सांगितले. आता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेचा निधी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ठेऊ नये असा ग्रामविकास विभागाने निर्णय घेतलेला आहे. ॲक्टनुसार जिल्हा परिषदेला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत पैसे ठेवता येतात.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून राष्ट्रीयकृत बँकेत किंवा राष्ट्रीयकृत बँकेतून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत पैसे ठेवण्यासाठी वित्त समिती, स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेची मंजुरी घ्यावयास पाहिजे. एका बँकेतून दुसऱ्या बँकेत पैसे ठेवण्याबाबत केवळ अधिकाऱ्यांनी निर्णय न घेता वित्त व सहकार विभागाने परिपत्रक काढलेले आहे. त्या परिपत्रकानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा उपनिबंधक यांनी बँकेची मागील ३ वर्षातील आर्थिक परिस्थिती तपासून त्या बँकेत पैसे ठेवावयाचे किंवा नाही याबाबत निर्णय घेऊन तो विषय जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेसमोर ठेवावयाचा आहे.मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांना सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेतल्याशिवाय पैसे काढण्याचे अधिकार नाहीत. जोपर्यंत सक्षम प्राधिकारी देयक संमत करीत नाही तोपर्यंत मुख्य लेखा व वित्त अधिकारी पैसे काढू शकत नाहीत.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदांचे पैसे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अडकून राहतात. एका वर्षापूर्वी संपूर्ण राज्यातील ६६७ कोटी रुपये अडकून होते. ज्यावेळी बँकेत ठेवी ठेवता त्यावेळी हमी घेतली जाते काय असा प्रश्न विचारला होता. परंतु, सर्वांना असे वाटते की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक टिकली पाहिजे, ग्रामीण भागातील बँका सक्षम झाल्या पाहिजेत. काही वेळा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत पैसे ठेवण्याबाबत दबाव आणला जातो. जिल्हा परिषदेने त्याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे. राज्य शासन जिल्हा परिषदेला तो निर्णय फेटाळून लावण्यासाठी दबाब आणू शकत नाही. यावर समितीने विचारणा केली की, वित्त विभागाने परिपत्रक काढलेले आहे. त्या परिपत्रकानुसार जिल्हा उप निबंधक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून त्यांनी ज्या बँकेत ठेवी ठेवलेल्या आहेत त्या बँकेची मागील ३ वर्षातील आर्थिक परिस्थिती कशी आहे, बँक नफ्यात आहे किंवा नाही हे बघावयाचे आहे. यावर प्रधान सचिव, सहकार विभाग यांनी खुलासा केला की, बँकांना करंट अकाऊंट मधील पैशातून कर्ज देता येत नाही. परंतु, ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासाठी करंट अकाऊंट मधील पैसे वापरता येतात असा नियम आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, सहकार विभाग आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक हे दोन्ही शासनाचे भाग आहेत. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सुद्धा चांगल्या पद्धतीने चालली पाहिजे. परंतु, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक चालविण्याबाबत जिल्हा परिषदेवर भार येऊ शकत नाही. जिल्हा परिषदेला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत पैसे ठेवता येतील हे आपण मान्य करु शकतो. परंतु, जिल्हा परिषदेने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत पैसे ठेवले नाहीत तर ते का ठेवले नाहीत असे होता कामा नये. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हा परिषदेने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ठेवी ठेवताना लेखापरिक्षण अहवाल व ताळेबंद मागवून घेतली पाहिजे. कारण, त्या बँकेवर शेकडो रुपयांचे कर्ज असेल तर ती बँक केव्हाही बुडीत निघू शकते. ग्रामविकास व वित्त विभागाने परिपत्रक काढलेले आहे. त्या परिपत्रकानुसार जिल्हा सहकारी बँकेचा मागील ३ वर्षातील आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करुन त्या बँकेत ठेवी ठेवावयाच्या किंवा नाही याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे. भविष्यात अशा घटना घडू नयेत आणि ठेवीदारांच्या ठेवी सुद्धा सुरक्षित राहिल्या पाहिजेत.

यावर समितीने विचारणा केली की, १७४ कोटी रुपयांमध्ये शासन निधीमधील कोणत्या लेखाशीर्षामधील पैसे आहेत. १७४ कोटी रुपयांमध्ये शासन निधीची रक्कम १०९ कोटी रुपये आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेला वेळोवेळी २९ कोटी रुपये प्राप्त झालेले आहेत. जिल्हा परिषदेने त्यापैकी अखर्चित राहिलेली रक्कम परत केलेली आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी कायदेशीर नोटीस देण्यात आली होती व दिनांक २१ सप्टेंबर, २०१८ रोजी त्यांनी उत्तर सादर केले होते. त्यामध्ये त्यांनी नमूद केले होते की, १-२ महिन्यामध्ये निधी किंवा कर्जमाफीची रक्कम प्राप्त होणार असून उक्त रक्कम प्राप्त झाल्यानंतर प्राधान्याने रक्कम येईल. उक्त कालावधीत त्यांच्याकडून कार्यवाही न झाल्याने याचिका दाखल केली असून ती दाखल होण्याच्या मार्गावर आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेची १७४ कोटी रुपये रक्कम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अडकलेली असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी हतबल झालेले आहेत. सदरहू रक्कम परत मिळत नसल्याची बाब विचारात घेऊन सदरहू प्रकरणी त्यांनी कार्यवाही केली आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी पंचायत समिती पाटोदा येथे भेट दिली असता सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेच्या दरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये पाटोदा पंचायत समितीचे सन २०१३-२०१४ या वर्षापासून ७ कोटी ५८ लाख एवढी रक्कम अडकून पडली आहे. बँकेत अडकलेल्या रक्कमेमध्ये वेतन व भत्त्याचा निधी देखील

समाविष्ट आहे. सदरहू विषय जिल्हा परिषद अध्यक्ष यांचेमार्फत सर्वसाधारण सभेच्या बैठकीमध्ये ठेवणे आवश्यक होते. तसे केले असते तर उक्त रक्कमेवर आतापर्यंत १५ कोटी रुपये एवढे व्याज प्राप्त झाले असते, सदरहू प्रकरणी बँकेची मालमत्ता विकून रक्कम वसूल करावयास पाहिजे होती. सदरचा अडकलेला निधी परत मिळावा यासाठी विधीज्ञ यांच्यामार्फत न्यायालयीन कार्यवाही करण्यात येत असून मा.उच्च न्यायालयामध्ये दावा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर वसुली करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने प्रदिर्घ विलंबाने कार्यवाही सुरु केल्याचे दिसून येते, त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत असून प्रस्तुत प्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यानुसार केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.

**तसेच बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये अडकलेली रक्कम पाटोदा पंचायत समितीला प्राप्त होण्याच्या दृष्टीने सहकार विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, बीड (प्रशासन)

### प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, पारनेर ता.पाटोदा, जि.बीड

पंचायती राज समितीने दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, पारनेर ता.पाटोदा, जि.बीड या ठिकाणी भेट दिली असता, भेटीच्या दरम्यान समितीच्या निदर्शनास आढळून आलेल्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.

आरोग्य केंद्रास कार्यालयीन वेळेमध्ये कुलूप लावल्याचे आढळून आले, आरोग्य केंद्रातील एकही कर्मचारी उपस्थित नव्हता, ग्रामस्थांनी सदरहू केंद्रातील डॉक्टर व कर्मचारी हे कधीच उपस्थित नसल्याने त्यांना ओळखत नसल्याची माहिती दिली, सदरहू उपकेंद्र वाली प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येते, सदरहू प्रकरणी समितीच्या निदर्शनास आढळून आलेल्या बाबींसंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिवांची साक्ष लावण्यात यावी, असे निदेश समितीने दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पारनेर आरोग्य उपकेंद्रास कार्यालयीन वेळेत समितीच्या एका गटाने भेट दिली असता आरोग्य उपकेंद्रास कुलुप लावल्याचे आढळून आले तसेच तेथील ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार सदरहू केंद्रात डॉक्टर व वैद्यकीय कर्मचारी उपस्थित राहत नाही या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चिती करुन पुढे कोणती कारवाई करण्यात आली ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.पीएचसी-१०९७/ २८६/प्र.क्र.२६/९७/आरोग्य-४, मंत्रालय, मुंबई, दिनांक १६ जानेवारी, २००३ **(परिशिष्ट ४.१)** नुसार उपकेंद्राच्या ठिकाणी आरोग्य सेविका, आरोग्य सेवक पुरुष व अंशकालीन स्त्री परिचर प्रत्येकी १ पद मंजूर असून सदर तीनही पदे भरलेली आहेत. उपकेंद्राच्या ठिकाणी डॉक्टरांचे पद मंजूर नाही. उपकेंद्र पारनेर अंतर्गत गांव पारनेर, कुटेवाडी, गवाळवाडी, यवलवाडी, शिखरवाडी, नागेशवाडी, वाणेवाडी येत असून सदर गावांची एकूण लोकसंख्या ४७६३ असून या सर्व गांवामध्ये प्रतिबंधात्मक सेवा व सर्व राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी उपकेंद्राच्या कर्मचाऱ्यांची आहे. त्यानुसार हे कर्मचारी सदर गावांना भेटी देऊन सेवा पुरवितात. सदरील आरोग्य उपकेंद्राची आरोग्य कर्मचारी श्रीमती हंबर्डे एम ए आरोग्य सेविका व श्री. गर्जे डी एन आरोग्य सेवक हे उपकेंद्र पारनेर या ठिकाणी उपस्थित राहत नाहीत याबाबत तालुका आरोग्य अधिकारी, पाटोदा यांचेकडून अहवाल घेण्यात आलेला असून त्यासोबत ग्रामपंचायत पारनेर व वैद्यकीय अधिकारी वहाली यांचा अहवाल सोबत जोडलेला असून त्यानुसार ते मुख्यालयी राहून उपकेंद्रांतर्गत सर्व गावांना भेटी देऊन नियमितपणे सेवा पुरवितात.

दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी सदर कर्मचारी नियोजित कार्यक्रमानुसार मौजे कुटेवाडी येथे नियमित आरोग्य सेवा सत्रास गेलेले होते. त्यामुळे पंचायत राज समितीच्या भेटीच्या वेळी उपकेंद्र बंद असल्याचे दिसून आले. सदरील आरोग्य कर्मचारी सकाळी ७.४० ते सायंकाळी ३.४५ पर्यंत कुटेवाडी गावांत उपस्थित होते. सदर दिवशी आरोग्य कर्मचारी यांनी सदरील गावातील ५३ घरामधील ८६ कंटेनर सर्वेक्षण केले. त्यापैकी २ कंटेनर दुषित आले. कंटेनर सर्वेक्षण करत असताना ज्या ठिकाणी दुषित कंटेनर आढळले त्या ठिकाणी ३ ताप असलेले रुग्ण आढळले. त्या रुग्णांना पीसीएम गोळ्या देण्यात आल्या व त्या ठिकाणचे आरोग्य कर्मचारी यांनी ३ रक्तनमुने घेतले. तसेच हंगामी वसतीगृह येथे भेट दिलेली आहे. सदरील आरोग्य सेवा सत्रात खालीलप्रमाणे बालकांचे लसीकरण करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | लसीचे नाव | डोस | | |
|---|---|---|---|---|
| | | I | II | II |
| १ | penta | १ | २ | १ |
| २ | polio | १ | ४ | |
| ३ | Measles | १ | ४ | |
| ४ | JE | १ | | |
| ५ | Dpt B | ४ | | |
| ६ | polio B | ४ | | |
| ७ | ANC | ३ | | |

दोन्हीही आरोग्य कर्मचाऱ्याचे राष्ट्रीय कार्यक्रमातील काम उत्कृष्ट असुन सन २०१७-१८ मध्ये उपकेंद्र पारनेरला उत्कृष्ट कामाबद्दल आनंदीबाई जोशी पुरस्कार (तृतीय पुरस्कार) प्रदान करण्यात आलेला आहे. सदरील दिवशी दोन्ही कर्मचारी कर्तव्यावर हजर असल्यामुळे त्यांच्यावर कार्यवाही करण्याता आलेली नाही.

**आरोग्य संचालनालयाचे अभिप्राय :-** जिल्हा आरोग्य अधिकारी, बीड यांच्या अभिप्रायाशी संचालनालय सहमत आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय :-** शासन सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने बीड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, पारनेर, ता.पाटोदा, जि.बीड या उपकेंद्रास कार्यालयीन वेळेत समितीच्या एका गटाने भेट दिली असता आरोग्य उपकेंद्रास कुलूप लावल्याचे आढळून आले तसेच तेथील ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार सदरहू केंद्रात डॉक्टर व वैद्यकीय कर्मचारी उपस्थित राहत नाही. या प्रकरणी चौकशी करण्यात येत आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चिती करुन पुढे कोणती कारवाई करण्यात आली, यावर प्रधान सचिव आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी समितीने सदर आरोग्य केंद्रास भेट दिली त्यावेळी त्या केंद्रातील कर्मचारी पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार मौजे कुटेवाडी येथे आरोग्य सेवा सत्रास गेले होते. कारण आपण प्रत्येक आरोग्य उपकेंद्रास लसीकरणाचा कार्यक्रम देतो. त्यानुसार सदर उपकेंद्रातील कर्मचारी सकाळी ७.४० ते दुपारी ३.४५ वाजेपर्यंत मौजे कुटेवाडी गावात उपस्थित होते. त्या कर्मचाऱ्यांनी किती कंटेनर्सचे सर्वेक्षण केले याचा अहवाल देखील आहे. हे चांगले उपकेंद्र असून या उपकेंद्रास डॉ.आनंदीबाई जोशी पुरस्कार देखील मिळालेला आहे. त्यामुळे सदर उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, पारनेर ता.पाटोदा, जि.बीड येथे भेट दिली असता समितीच्या निदर्शनास आले की, प्राथमिक आरोग्य उपकेंद्रास कार्यालयीन वेळेमध्ये कुलुप लावलेले होते व त्याठिकाणी डॉक्टर व कर्मचारी अनुपस्थित होते. यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखा माहितीनुसार सदर उपकेंद्राच्या ठिकाणी आरोग्य सेविका, आरोग्य सेवक पुरुष व अंशकालीन स्त्री परिचर प्रत्येकी १ पद मंजूर असून तीनही पदे भरलेली आहेत. उपकेंद्राच्या ठिकाणी डॉक्टरांचे पद मंजूर नाही उपकेंद्र पारनेर अंतर्गत गांव पारनेर, कुटेवाडी, गवाळवाडी, यवलवाडी, शिखरवाडी, नागेशवाडी, वाणेवाडी येत असून सदर गावांची एकूण लोकसंख्या ४७६३ असून या सर्व गांवामध्ये प्रतिबंधात्मक सेवा व सर्व राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी उपकेंद्राच्या कर्मचाऱ्यांची आहे. त्यानुसार हे कर्मचारी सेवा पुरवितात सदर उपकेंद्राचे आरोग्य कर्मचारी, आरोग्य सेविका व आरोग्य सेवक हे उपकेंद्र पारनेर याठिकाणी उपस्थित राहत नाहीत ते मुख्यालयी राहून उपकेंद्रांतर्गत सर्व गावांना भेटी देऊन नियमितपणे सेवा पुरवितात समितीने भेट दिली, त्यावेळी उक्त कर्मचारी नियोजित कार्यक्रमानुसार मौजे कुटेवाडी येथे नियमित आरोग्य सेवा सत्रास गेलेले होते, त्यामुळे उपकेंद्र बंद असल्याचे समितीला दिसून आले. **उपरोक्त माहितीच्या आधारे विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, पारनेर हे चांगले उपकेंद्र असून या उपकेंद्रास डॉ.आनंदीबाई जोशी पुरस्कार मिळालेला आहे, त्यामुळे सदर उपकेंद्राबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे.**

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, बीड (प्रशासन)

### बीड जिल्ह्यातील चार पंचायत समित्यांना स्टाफ पॅटर्न मंजुर नसल्यामुळे शिक्षण विभागातील पदे मंजुर नाहीत त्यामुळे प्रभारी अधिकाऱ्यांना काम करणे जिकिरीचे झाल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी पंचायत समिती, धारूर जिल्हा बीड या जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीने विचारणा केली की, सन २०१६-२०१७ आणि सन २०१७-२०१८ मध्ये किती अधिकाऱ्यांनी पंचायत समितीला भेटी दिल्या आहेत, यवार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धारुर यांनी समितीस विदीत केले की, दिनांक ३ जानेवारी २०१७ रोजी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी भेटी दिलेल्या आहेत. यावर समितीने विचारणा केली की, डॉ.भोकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी समितीला भेट दिली आहे का, यावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धारुर यांनी समितीस विदित केले की, डॉ.भोकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भेट दिलेली आहे, परंतु नोंद केलेली नाही. समितीने विचारणा केली की, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी केज आणि धारुर पंचायत समितीला भेटी देणे आवश्यक असताना त्यांनी भेटी दिलेल्या नाहीत, याबाबत संबंधित अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून द्यावे. सन २०१६-२०१७ मध्ये पंचायत समिती धारुर येथे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी भेट दिलेली नाही, ही अतिशय गंभीर बाब आहे.

धारुर तालुक्यात किती प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत, यावर तालुका आरोग्य अधिकारी यांनी समितीस उत्तर दिले की, २ प्राथमिक आरोग्य केंद्र असून त्यामध्ये ३४ पदे मंजूर आहेत. तद्नंतर समितीने विदित केले की, २ प्राथमिक आरोग्य केंद्र असून १४ उप केंद्रे आहेत. यामध्ये १४ आरोग्य सेवकांची पदे रिक्त आहेत, तसेच इतर ३४ कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. ही पदे ताबडतोब भरण्याबाबत समिती शासन स्तरावर शिफारस करेल. यावर तालुका आरोग्य अधिकारी यांनी समितीस विशद केले की, मोखेड येथील हेड क्वॉटर्सची अवस्था चांगली नाही. मोगलवाडी येथे कर्मचारी/ अधिकाऱ्यांसाठी बॉयोमेट्रीकची व्यवस्था केलेली आहे. या तालुक्यात दोन ॲम्फ्रुलन्स असून त्यातील १०८ क्रमांकाची ॲफ्रूलन्स धारुर येथे असून दुसरी तेलगाव येथे आहे. ग्रामीण रुग्णालय धारुर येथे आहे.

समितीने प्रभारी गट शिक्षणाधिकारी यांना विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या किती प्राथमिक आणि खाजगी शाळा आहेत, याबाबत प्रभारी गट शिक्षणाधिकारी यांनी समितीस विदित केली की, ते जिल्हा परिषदेला शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून कार्यरत आहे. धारुर येथील पद रिक्त असल्यामुळे त्यांच्याकडे प्रभारी चार्ज दिलेला आहे. या तालुक्यात १ शासकीय शाळा असून जिल्हा परिषदेच्या १३८ शाळा आहेत. प्राथमिक अनुदानित २९ शाळा आणि खाजगी विनाअनुदानित १३ शाळा अशा एकूण १८१ शाळा धारुर पंचायत समितीमध्ये आहेत. जिल्हा परिषदेच्या माध्यमिक ३ शाळा, खाजगी अनुदानित २९ शाळा आणि विनाअनुदानित १३ शाळा अशा एकूण ४२ शाळा आहेत. समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आणि खाजगी किती शाळा आहेत, जिल्हा परिषदेच्या माध्यमिक किती शाळा आणि खाजगी संस्थेच्या किती माध्यमिक शाळा आहेत, यावर, प्रभारी गट शिक्षणाधिकारी यांनी समितीस विदित केले की, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा १ ते ५ पर्यंत अशा एकूण १०५ शाळा आहेत. १३८ प्राथमिक शाळा, खाजगी अनुदानित २९ आणि खाजगी विनाअनुदानित १३ अशा एकूण १८१ शाळा आहेत.

तद्नंतर समितीने प्रभारी गट शिक्षणाधिकारी यांना विचारणा केली की, केज तालुक्यात पाच विस्तार अधिकारी आहेत आणि येथे एकही विस्तार अधिकारी नाही. यावर, प्रभारी गट शिक्षणाधिकारी यांनी समितीस विदित केले की, धारुर पंचायत समितीला स्टाफ पॅटर्न मंजूर झालेला नाही. एवढेच नव्हे तर यासोबतच परळी, शिरुर आणि वडवाणी येथेही स्टाफ पॅटर्न मंजूर झालेला नाही.

यावर समितीने मत व्यक्त केले की, बीड जिल्ह्यातील चार पंचायत समित्यांना स्टाफ पॅटर्न मंजूर नसल्यामुळे शिक्षण विभागातील पदे मंजूर नाहीत त्यामुळे संबंधित प्रभारी अधिकाऱ्यांना काम करणे जिकिरीचे झालेले आहे. शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल. असे समितीने संबंधितांना निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

बीड जिल्ह्यातील चार पंचायत समित्यांना स्टाफ पॅटर्न मंजुर नसल्यामुळे शिक्षण विभागातील पदे मंजुर नाहीत त्यामुळे प्रभारी अधिकाऱ्यांना काम करणे जिकरीचे झालेले आहे, याबाबत शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

बीड जिल्ह्यातील शिरुर, परळी, धारुर, वडवणी या चार तालुक्यातील गटशिक्षणाधीकारी कार्यालयास स्टाफ पॅटर्न मध्ये फक्त वरील तालुकानिहाय गटशिक्षणाधिकारी हे वर्ग २ राजपत्रीत अधिकाऱ्यांचे पद मंजुर असून शालेय पोषण आहार अधिक्षक वर्ग २ चे पद मंजुर नाही. तसेच इतर तालुक्याच्या सरासरीप्रमाणे वर्ग-३ ची वरिष्ठ, कनिष्ठ सहाय्यक ३, परिचर-५ ही पदे मंजुर केलेली नाहीत. तसेच विस्तार अधिकारी (शिक्षण)

श्रेणी-२ ची परळी-४ धारुर ३, वडवणी १ व शिरुर का. १ या प्रमाणे सदर तालुक्यासाठी पदे मंजुरीसाठी बीड जिल्हा परिषदेने पत्र क्र. जिपबी/शिवि/ मावि-१ब/ कावि-१३४/६७७/२०१५ दिनांक १८ फेब्रुवारी, २०१५ अन्वये वरील ४ तालुक्यासाठी स्टॉफ पॅटर्न मंजूर करण्याबाबत शासनास कळविलेले आहे. शासन स्तरावरुन मान्यता मिळालेली नाही. शासनाकडून मान्यता मिळताच सदरची पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. सद्यस्थितीत जिल्हा परिषद स्तरावरुन संबंधित ठिकाणी इतर कर्मचाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार सोपवून कामकाज हाताळण्यात येत आहे. करिता अनुपालन स्विकृत व्हावे ही विनंती.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (आस्था-८) गटशिक्षणाधिकारी कार्यालयाचा पदांचा आकृतीबंध मंजूर करण्याचे अधिकार शालेय शिक्षण विभागाचे आहेत.

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** सदर मुद्दा हा ग्राम विकास विभागाच्या अखत्यारीतील आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने बीड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, बीड जिल्ह्यातील चार पंचायत समित्यांना कर्मचारीवृंद (स्टाफ पॅटर्न) मंजूर नसल्यामुळे शिक्षण विभागातील पदे मंजूर नाहीत, त्यामुळे प्रभारी अधिकाऱ्यांना काम करणे जिकरीचे झालेले आहे. याबाबत शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, जे १०-१२ तालुके निर्माण झाले होते त्या संदर्भात सन २०१० मध्ये कर्मचारीवृंद मंजूर करुन दिला होता. त्यांचे असे म्हणणे आहे की, जो कर्मचारीवृंद मंजूर झालेला आहे त्यामध्ये काही पदांचा समावेश नाही. ही वस्तुस्थिती आहे की, जेथे जेथे कर्मचारीवृंद मंजूर झालेला आहे त्यापेक्षा अधिक पदांची गरज आहे. आपणास पुन्हा कर्मचारीवृंद मंजूर करुन घेता येईल. दुसरी गोष्ट म्हणजे शाळेतील मुले कमी होत आहेत. तेव्हा या संदर्भात पुन्हा आढावा घेणे आवश्यक आहे. नवीन पंचायत समित्या निर्माण झाल्या होत्या त्या सर्वांसाठी तो कर्मचारीवृंद होता. पंचायत समितीमध्ये काय स्टॅंडर्ड असणे आवश्यक आहे, त्याबाबत चर्चा करण्यात येईल.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी पंचायत समिती, धारुर येथे भेट दिली असता सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, बीड जिल्हा परिषदेमधील शिक्षण विस्तार अधिकारी धारुर पंचायत समितीमध्ये प्रभारी गट शिक्षण अधिकारी म्हणून कार्यरत आहेत तसेच बीड जिल्ह्यातील चार पंचायत समित्यांना कर्मचारीवृंद (स्टॉफ पॅटर्न) मंजूर नसल्यामुळे शिक्षण विभागातील पदे मंजुर नाहीत त्यामुळे प्रभारी अधिकाऱ्यांना काम करणे कठीण झालेले आहे.

या प्रकरणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीनुसार बीड जिल्ह्यातील शिरुर, परळी, धारुर, वडवणी या चार तालुक्यातील गट शिक्षणाधिकारी कार्यालयास कर्मचारीवृंद (स्टॉफ पॅटर्न) मध्ये तालुकानिहाय गटशिक्षणाधिकारी हे वर्ग-२ चे राजपत्रित अधिकाऱ्याचे पद मंजूर असून शालेय पोषण आहार अधीक्षक वर्ग २ चे पद मंजूर नाही. तसेच इतर तालुक्याच्या सरासरीप्रमाणे वर्ग-३ चे वरिष्ठ, कनिष्ठ सहायक ३, परिचर-५ ही पदे मंजूर केलेली नाहीत. तसेच विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-२ ची परळी-४, धारुर-३, वडवणी-१ व शिरुर का.१ या प्रमाणे जिल्हा परिषदेने शासनास कळविलेले आहे. तथापि, शासन स्तरावर मान्यता मिळालेली नाही त्यामुळे इतर कर्मचाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार सोपवून कामकाज हाताळण्यात येत आहे. याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

याप्रकरणी विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, **सन २०१० मध्ये पंचायत समित्यांसाठी कर्मचारीवर्ग मंजूर करुन दिलेला होता. सदर मंजूर कर्मचारीवर्गामध्ये काही पदाचा समावेश नाही ही वस्तुस्थिती असली तरी आवश्यक पदांचा आढावा घेऊन ती पदे त्वरित भरती करण्यासंदर्भात शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी समिती शिफारस करीत आहे. उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

# परिशिष्ट (अ)

## शासनाचे आदेश, शासन निर्णय व परिपत्रके

राज्यातील उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ३० खाटांच्या ग्रामिण/ कुटीर रुग्णालयांच्या कर्मचारी आकृतीबंधात सुधारणा करण्याबाबत.

(परिशिष्ट ४.१)

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्र.पीएचसी-१०९७/२८६/प्र.क्र २६/९७/आरोग्य-४
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक : १६ जानेवारी, २००३

संदर्भ : १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग,क्र. पीएचसी-१०९४/ ४१९९/प्र.क्र.१३/९५/आरोग्य-४,दिनांक १.१.१९९६
२) महासंचालक, आरोग्य सेवा, म.रा.मुंबई यांचे क्र.संआसे/निविमु/ग्रा.रु./ प्रा.आ.के./आकृतीबंध /टे-२/कक्ष-७/०२,दि.१३.८.२००२
३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.पीएचसी १०९४/४१८९/ प्र.क्र.१३/९५/आरोग्य ४, दि.१४ ऑगस्ट, २००२.

**प्रस्तावना** : राज्यातील उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ३० खाटांच्या ग्रामिण व कुटीर रुग्णालयांच्या कर्मचारी आकृतीबंधास उपरोक्त संदर्भ क्र. १ व ३ वरील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या आकृतीबंधात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व ३ अन्वये मान्यता दिलेल्या (उपकेंद्राचा आकृतीबंध वगळता) प्राथमिक आरोग्य केंद्रे व ग्रामिण/ कुटीर रुग्णालये यांचा आकृतीबंध रद्द समजण्यात यावा आणि आता या शासन निर्णयाच्या प्रपत्र "ब" व "क" मधील अनुक्रमे प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ३० खाटांच्या ग्रामिण व कुटीर रुग्णालयाच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात येत आहे आणि उपकेंद्राचा आकृतीबंध प्रपत्र "अ" प्रमाणे कायम ठेवण्यात आला आहे.

२. या शासन निर्णयाच्या सहपत्रात नमूद केल्यानुसार कंत्राटी पद्धतीवर उपलब्ध करावयाच्या सुविधासाठी नियमित पद्धतीने पदे भरली असता येणा-या वेतन खर्चाच्या ५० टक्क्यापेक्षा जास्त खर्च येऊ नये. ही कामे कंत्राटी पद्धतीने घेण्यासाठी द्यावयाच्या मोबदल्याकरीता अर्थसंकल्पीय तरतूद करण्याची कार्यवाही महासंचालकांनी करावी.

३. कामगार विभागा अंतर्गत कंत्राटी पद्धतीने सुरक्षा सेवा व इतर सेवा देणारी विविध मंडळे अस्तित्वात आहेत. त्यांच्यामार्फत या सेवा घेण्यात याव्यात. या व्यतिरिक्त जिल्हास्तरावर सुरक्षा सेवेसाठी सैनिक बोर्ड मार्फत सेवा घेण्यात यावी.

४. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत सर्व पदाच्या आढाव्यानुसार उपलब्ध होणा-या अतिरिक्त पदांमधून प्राथमिक आरोग्य केंद्रे/ग्रामीण/कुटीर रुग्णालयात प्राधान्याने पदे उपलब्ध करुन द्यावीत.

त्यानंतर सरलेल्या पदांच्या पदनिर्मितीकरीता महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी [illegible] प्रस्ताव सादर करावा.

५ सदर शासन निर्णय दि.१५.१.२००३ रोजी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीने मान्यता दिल्यानुसार व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४२/विसु. दिनांक १५.१.२००३ अन्वये व त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

( प्र.कं.प्रधान )
उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,
प्रधान सचिव (आरोग्य) , सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (कुटुंब कल्याण) , सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
महालेखापाल (लेखा परीक्षा)/ (लेखा अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
सहसंचालक, आरोग्य सेवा (निविमु) मुंबई.
सहसंचालक, आरोग्य सेवा (आ.)पुणे.
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण मा.बा.सं. व शा.आ.) पुणे.
आरोग्य सेवा उपसंचालक, प्रभारी सर्व आरोग्य मंडळे.
सर्व जिल्हा शल्य चिकित्सक.
सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद
सर्व जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन व विकास मंडळ.
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई .
आरोग्य -२ ( अतिरिक्त पदांच्या करावयाच्या कार्यवाहीबाबत), सा.आ.वि.मंत्रालय, मुंबई.
अर्थसंकल्प कार्यासन, सा.आ.वि.मंत्रालय, मुंबई.
आस्थापना कार्यासन ,सा.आ.वि.मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती आरोग्य-४ ,सा.आ.वि.मंत्रालय, मुंबई.

शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. पीएचसी-१०९७/२८६/प्र.क्र.२६/९७/आरोग्य-४ दिनांक १६ जानेवारी, २००३ चे सहपत्र.

**प्रपत्र अ**

**उपकेंद्रांचा कर्मचारी आकृतीबंध**

निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.पीएचसी १०९४/४२९१/प्र.क्र.१३/९५/आ.४, दि.१.१.१९९६ मध्ये विहित केल्याप्रमाणे कायम ठेवण्यात आलेला आकृतीबंध

| अ.क्र. | पदाचे नांव | मंजूर पदे |
|---|---|---|
| १) | स्त्री आरोग्य कर्मचारी (ए.एन.एम.) | १ |
| २) | पुरुष आरोग्य कर्मचारी (एम.पी.डब्ल्यू.) | १ |
| ३) | अंशकालीन स्त्री परिचर | १ |
| | एकूण | ३ |

शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.पीएचसी-१०९७/२८६/प्र.क्र.२६/९७/आरोग्य-४
दिनांक १६ जानेवारी, २००३ चे सहपत्र.

**प्रपत्र -ब**

**प्राथमिक आरोग्य केंद्राचा कर्मचारी आकृतीबंध**

| अ.क्र. | पदाचे नांव | बिगर आदिवासी क्षेत्रासाठी मंजूर पदे | आदिवासी क्षेत्रासाठी मंजूर पदे |
|---|---|---|---|
| | **तांत्रिक पदे** | | |
| १ | वैद्यकीय अधिकारी,वर्ग-२ | २ | १ |
| २ | वैद्यकीय अधिकारी, वर्ग-३ | - | १ |
| ३ | आरोग्य सहाय्यक (पुरुष) | १ | १ |
| ४ | आरोग्य सहाय्यक (स्त्री) | १ | १ |
| ५ | सहाय्यक परिचारिका प्रसाविका (ए.एन.एम.) | १ | १ |
| ५ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | - | १ |
| ६ | मिश्रक | १ | १ |
| . | **अतांत्रिक पदे** | | |
| ७ | कनिष्ठ लिपिक | १ | १ |
| ८ | वाहन चालक | १ | १ |
| ९ | सफाईगार | १ | १ |
| १० | स्त्री परिचर | १ | १ |
| ११ | पुरुष परिचर | ३ | ३ |
| | **एकुण** | **१३** | **१४** |

**प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी कंत्राटी पद्धतीवर उपलब्ध करावयाच्या सुविधा**

१) सुरक्षेच्या सेवा
२) स्वच्छतेच्या सेवा
३) वाहन चालक

**टीप :** ज्या ग्रामीण रुग्णालयांना वाहन चालकांची पदे मंजूर असून त्या पदांवर नियुक्त्या केलेल्या आहेत त्या पदांवरील कर्मचारी सेवानिवृत्त होईपर्यंत फक्त ती पदे चालू राहतील. त्यानंतर सेवा वाहनचालक कंत्राटी पद्धतीने दिले जातील.

**टीप :** ज्या ग्रामीण रुग्णालयांना वाहनचालकांची पदे मंजूर असून त्या पदावर नियुक्त्या केलेल्या आहेत त्या पदावरील कर्मचारी सेवानिवृत्त होईपर्यंत फक्त ती पदे चालू राहतील. त्यानंतर सेवा वाहनचालकाच्या कंत्राटी पद्धतीने दिले जातील.

....

# परिशिष्ट (ब)

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक १० जानेवारी, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, बीड**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(३) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(६) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(८) ॲड. दिलीप सोपल, वि.स.स.

(९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(११) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**जिल्हा परिषद पदाधिकारी**

(१) श्रीमती सविता गोल्हार, अध्यक्षा, जिल्हा परिषद, बीड

(२) श्रीमती जयश्री मस्के, उपाध्यक्षा, जिल्हा परिषद, बीड

(३) श्री.संतोष हंगे, सभापती, समाजकल्याण समिती, जिल्हा परिषद, बीड

(४) श्री.राजेसाहेब देशमुख, सभापती, शिक्षण व आरोग्य समिती, जिल्हा परिषद, बीड

(५) श्री.युध्दाजित पंडित, सभापती, अर्थ व बांधकाम समिती, जिल्हा परिषद, बीड

(६) श्रीमती शोभा दरेकर, सभापती, महिला व बालकल्याण समिती, जिल्हा परिषद, बीड

(७) श्री.अशोक लोढा, सदस्य, जिल्हा परिषद, बीड

(८) श्री. ज्ञानेश्वर प्रभाकर कोकाटे, सभापती, पंचायत समिती, बीड

**स्थानिक निधी लेखा संचालनालय**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई**

श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**आयुक्त कार्यालय, औरंगाबाद**

श्री. श्याम पटवारी, सहाय्यक आयुक्त (चौकशी), आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**जिल्हा परिषद, बीड**

(१) श्री. धनराज निला, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. सुरेश केंद्रे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(३) श्री. धनवंत माळी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग)

(४) डॉ. सुनिल भोकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) विभाग

(५) श्री. मधुकर वासनिक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

(६) श्री. उदय साळुंखे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग (७) डॉ.आर.जी.पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

(८) श्री. भगवान सोनवणे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(९) श्री. ए. एस. बोबलगे, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग

(१०) श्री. एस. बी. स्वामी, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्रमांक १

(११) श्री. एस. के. करंजे, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्रमांक २

(१२) डॉ. संतोष शिवाजी पालवे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१३) श्री. सुनिल खंडारे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग

(१४) श्री. प्रशांत भामरे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

(१५) श्री. रविंद्र तुरुकमारे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१६) श्री. के. ना. कुटे, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(१७) श्री. डी. पी. बिटके, कृषि विकास अधिकारी

(१८) श्री. रा. र. गायकवाड, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) विभाग

(१९) श्रीमती एम.एस.कांबळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, धारुर

(२०) श्री. एस. बी. सोनवणे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर (का)

(२१) श्री. एन. पी. राजगुरु, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई

(२२) श्री.एस.पी.भागवत, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बीड

(२३) श्री. डी. बी. गिरी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अंबाजोगाई

(२४) श्री. ए. बी. गुंजकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, केज

(२५) श्री. विठ्ठल नागरगोजे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वडवणी

(२६) श्री. अे. आर. सरगर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आष्टी

(२७) श्री. जे. वाय. स्वामी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पाटोदा

(२८) श्री. एस. एन. केंद्रे, प्रभारी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वैजनाथ

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१२-२०१३ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील बीड जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक ११ जानेवारी, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, बीड**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(३) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(५) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(६) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(८) ॲड. दिलीप सोपल, वि.स.स.
(९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(१०) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.
(११) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(१२) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
(१३) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(२) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(३) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**जिल्हा परिषद, बीड**

(१) श्री. धनराज निला, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. सुरेश केंद्रे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(३) श्री. धनवंत माळी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग)
(४) डॉ. सुनिल भोकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) विभाग
(५) श्री. मधुकर वासनिक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
(६) डॉ. आर. जी. पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी
(७) श्री. भगवान सोनवणे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(८) श्री. ए. एस. बोबलगे, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग
(९) श्री. एस. बी. स्वामी, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्रमांक १
(१०) श्री. एस. के. करंजे, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्रमांक २
(११) डॉ. संतोष शिवाजी पालवे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१२) श्री. सुनिल खंडारे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग

(१३) श्री. प्रशांत भामरे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

(१४) श्री. रविंद्र तुरुकमारे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१५) श्री. के. ना. कुटे, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(१६) श्री. डी. पी. बिटके, कृषि विकास अधिकारी

(१७) श्री. रा. र. गायकवाड, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) विभाग

(१८) श्रीमती एम. एस. कांबळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, धारुर

(१९) श्री. एस. बी. सोनवणे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर (का)

(२०) श्री. एन. पी. राजगुरु, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई

(२१) श्री. एस. पी. भागवत, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बीड

(२२) श्री. डी. बी. गिरी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अंबाजोगाई

(२३) श्री. ए. बी. गुंजकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, केज

(२४) श्री. विठ्ठल नागरगोजे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वडवणी

(२५) श्री. अे. आर. सरगर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आष्टी

(२६) श्री. जे. वाय. स्वामी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पाटोदा

(२७) श्री. एस. एन. केंद्रे, प्रभारी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वैजनाथ

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-२ संदर्भात बीड जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक १२ जानेवारी, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, बीड**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(३) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(६) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(७) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(८) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(९) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(११) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई**

श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**आयुक्त कार्यालय, औरंगाबाद**

श्री. श्याम पटवारी, सहाय्यक आयुक्त (चौकशी), आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**जिल्हा परिषद, बीड**

(१) श्री. धनराज निला, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. सुरेश केंद्रे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(३) श्री. धनवंत माळी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग)

(४) डॉ. सुनिल भोकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) विभाग

(५) श्री. मधुकर वासनिक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

(६) डॉ. आर. जी. पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

(७) श्री. भगवान सोनवणे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(८) श्री. ए. एस. बोबलगे, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग

(९) श्री. एस. बी. स्वामी, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्रमांक १

(१०) श्री. एस. के. करंजे, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्रमांक २

(११) डॉ. संतोष शिवाजी पालवे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१२) श्री. सुनिल खंडारे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग

(१३) श्री. प्रशांत भामरे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

(१४) श्री. रविंद्र तुरुकमारे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१५) श्री. के. ना. कुटे, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(१६) श्री. डी. पी. बिटके, कृषि विकास अधिकारी

(१७) श्री. रा. र. गायकवाड, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) विभाग

(१८) श्रीमती एम. एस. कांबळे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धारुर

(१९) श्री. एस. बी. सोनवणे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर (का)

(२०) श्री. एन. पी. राजगुरु, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई

(२१) श्री. एस. पी. भागवत, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बीड

(२२) श्री. डी. बी. गिरी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अंबेजोगाई

(२३) श्री. ए. बी. गुंजकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, केज

(२४) श्री. विठ्ठल नागरगोजे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वडवणी

(२५) श्री. अे. आर. सरगर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आष्टी

(२६) श्री. जे. वाय. स्वामी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पाटोदा

(२७) श्री. एस. एन. केंद्रे, प्रभारी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वैजनाथ

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांनी सन २०१२-१३ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील बीड जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

(शा.म.मु.) एचबी ७२९-७ (४५०—६-२०१९)

**मंगळवार, दिनांक १ जानेवारी, २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(४) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(५) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव

(२) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री.मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव**

(१) श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

(२) डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(३) श्रीमती आभा शुक्ला, प्रधान सचिव, सहकार विभाग

(४) श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग

(५) श्री. एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(६) श्री. सतिश सोनी, आयुक्त, सहकार विभाग

(७) श्री. एस. एल. अहिरे, संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती

(८) श्री. भा. र. गावित, सह सचिव, विमुक्त जाती भटक्या जमाती व इतर मागासवर्ग कल्याण विभाग

(९) श्री. ला. रा. गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग

(१०) श्री. र. प्र. आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग

(११) श्री. गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(१२) श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(१३) श्री. र. आ. नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(१४) श्री. संतोष कराड, अवर सचिव, ग्रामविकास विभाग

(१५) श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

(१६) डॉ. विजय कुंदेवाड, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय

(१७) डॉ. एस. एन. जाधव, उपनिबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त कार्यालय

(१८) श्री. गो. भ. शिंदे, अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

(१९) श्री. र. वा. सरफरे, कक्ष अधिकारी, महिला व बालविकास विभाग

**जिल्हा परिषद, बीड**

(१) श्री. अमोल येडगे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

(२) श्री. डी. व्ही. निला, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

(३) श्री. धनवंत माळी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, बीड

(४) डॉ. सुनिल भोकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, बीड

(५) डॉ. आर. बी. पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

(६) श्री. सुनील खंडारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापापु), जिल्हा परिषद, बीड

(७) श्री. सी. एस. केकान, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक), जिल्हा परिषद, बीड

(८) श्री. विष्णु वाघमोडे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड

(९) श्री. रा. र.गायकवाड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड

(१०) श्री. चंद्रकांत गजभिये, मु.अ. व वि.का.अ.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१२-१३ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, सहकार विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, आयुक्त, सहकार विभाग, संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती, सह सचिव, विमुक्त जाती भटक्या जमाती व इतर मागासवर्ग कल्याण विभाग, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, कक्ष अधिकारी, महिला व बालविकास विभाग, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, उपनिबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त कार्यालय तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ८ जानेवारी, २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(३) ॲड. दिलीप सोपल, वि.स.स.

(४) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, कोंकण भवन, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**मंत्रालयीन विभागीय सचिव**

(१) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(३) श्री. चंद्रशेखर जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग

(४) श्रीमती शुभांगी शेठ, सह सचिव, वित्त विभाग

(५) श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(६) श्री. म. र. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(७) श्री. विजयकुमार कलवले, सहाय्यक संचालक, मृद व जलसंधारण विभाग

**जिल्हा परिषद, बीड**

(१) श्री. अमोल येडगे, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. डी. व्ही. निला, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. डी. आर. माळी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(४) डॉ. सुनिल मोकाटे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(५) श्री. के. ना. कुटे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(६) श्री. एस. एम. साळवे, कृषी विकास अधिकारी

(७) श्री. एम. एस. वासनिक, समाजकल्याण अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१२-१३ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, सह सचिव, वित्त विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सहाय्यक संचालक, मृद व जलसंधारण विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड यांची उर्वरित साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक ९ जानेवारी, २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(३) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(४) ॲड. दिलीप सोपल, वि.स.स.

(५) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव**

(१) श्री. रा. बा. पानसे, सचिव, (प्र व स), जलसंपदा विभाग

(२) श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(३) श्री. धनराज निला, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

(४) श्री. आर. एस. काळे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(५) श्री. एम. एस. वासनिक, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(६) श्रीमती सु. प्र. अहिरराव, सहाय्यक संचालक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(७) श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

(८) श्री. दि. रा. टकले, कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१२-१३ च्या लेखा परिक्षा पुर्नविलोकन अहवाल व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी सचिव, (प्र व स), जलसंपदा विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, सहाय्यक संचालक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड यांची उर्वरित साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १६ जानेवारी, २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(४) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(५) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**मंत्रालयीन विभागीय सचिव**

(१) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(३) श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(४) श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(५) श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

**जिल्हा परिषद, बीड**

(१) श्री. अमोल येडगे, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. धनराज निला, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. आर. एस. काळे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(४) श्री. एम. एस. वासनिक, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१२-१३ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड यांची उर्वरित साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक २७ जून २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :-**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) ॲड. राहुल कुल, वि.स.स.

(३) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(४) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(५) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(६) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(७) श्री. भारत भालके, वि.स.स.

(८) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(९) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(११) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(१२) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :-**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(३) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(४) श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने बैठकीत तिसाव्या व एकतीसाव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केले.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई